

पर्युषण पर्वात आयोजित पज्जुसणा कप्प स्थापना स्पर्धेतील निकाल व बक्षीस वितरण कार्यक्रम रविवारी झाला.

# पर्युषण पर्वात आयोजित पज्जुसणा कप्प स्थापना स्पर्धेतील विजेते जाहीर

नगर – आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात विविध धार्मिक अनुष्ठान होत आहेत. गुरूदेवांच्या कृपाशीर्वादाने पर्युषण पर्व काळात पज्जुसणा कप्प स्थापना व सजावट रील स्पर्धा घेण्यात आली. यात शेकडो भाविकांनी श्रद्धेने सहभाग नोंदवला आणि घरात पज्जुसणा कप्प स्थापना केली. यातून अतिशय कल्पकतेने जैन परंपरांची सुंदरता सादर करण्यात आली. या स्पर्धेचा निकाल व बक्षीस वितरण कार्यक्रम रविवारी झाला.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., विनितदर्शनाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा करण्यात आली. प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये रोख बक्षीस ४ जणांना विभागून देण्यात आले.

(विभागून) तनुश्री कांकरिया व तुलसी कांकरिया, सारीका कटारिया, सुरभी शिंगवी व आरती सुराणा, अद्वैती सोलंकी आणि अनिता गुगळे यांना प्रथम क्रमांक

(विभागून ५१ हजार रूपये) अर्चना विकास सुराणा, सिमरन सुचित मुथा, सिद्ध आराधना ग्रुप (सोनाली डुंगरवाल, मृणाली भंडारी, राखी गांधी, वर्षा मेहेर), अमित मेहेर यांना द्वितीय क्रमांक

(विभागून ३१ हजार रूपये) किरण मुथा, गौतमी मंडलेचा, अर्चना शेटिया, उज्वला लोढा यांना तृतीय क्रमांक

(विभागून २१ हजार रुपये) ईश्वरी बोरा व नेहा गौतम मुथा यांना चतुर्थ क्रमांक

(विभागून ११ हजार रूपये) ज्योती संतोष गुगळे, प्रणीत राजकुमार बोरा व सागर मदनलाल देसरडा यांना पाचवा क्रमांक मिळाला.

बक्षीस वितरण प्रसंगी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, राजमल चंगेडिया, पोपटलाल कटारिया, प्रविण कटारिया, सपना कटारिया व विजेत्यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.

श्रुती गांधी यांनी पुरस्कारांचे वाचन केले. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे उद्योगपती आणि अहिल्यानगरचे पुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

अशोक बोरा म्हणाले, या समर्पण चातुर्मासातील पर्युषण पर्वात भक्ती, श्रद्धा आणि गुरूदेवांप्रती मोठे समर्पण पहायला मिळाले. पज्जुसणा कप्प स्थापना स्पर्धेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. पंच कल्याणक, गोशालक दृष्टांत, सहा लेश्या, भगवान ऋषभदेव, कर्म की यात्रा व सर्व गती, गिरनार तीर्थ, तीर्थंकर समवशरण अशा विविध विषयांवर अतिशय सुंदर कलाकृती सादर करण्यात आल्या. नवीन पिढीपर्यंत जैन परंपरेचा वारसा पोहोचवण्याचे काम या माध्यमातून झाले. प्रत्येकाने अतिशय सुंदर रचना केल्याने प्रत्येक गटात विभागून बक्षीसे देण्यात आली आहे. विजेत्यांच्या कलाकृतींचे व्हिडिओ समर्पण चातुर्मास कमिटीच्या इन्स्टाग्राम पेज, युट्यूबवर उपलब्ध आहेत.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आपण शहाणपणा सोडू नये






ज्याला झोप येत नाही, त्याला रात्र खूप मोठी वाटते. ज्याच्या अंगात त्राण नाही, त्याला अंगणातली शतपावलीदेखील मैलोगणती फिरल्यासारखी जेरीला आणते. ज्याला नीति, व्यवहार आणि धमई कळत नाही, त्या मूर्खाला जीवनात मौजच नसते, असे गौतम बुद्धांची शिकवण सांगते पण मूर्ख कुणाला म्हणावे ? नीतीची व्याख्या कालसापेक्ष आणि थोर व्यक्तिमतानुसार व्यवहारदेखील असा सापेक्षच आणि धर्म तर मुळातच परिवर्तनशील.

तेव्हा प्रश्न तसाच उरतो, की मूर्ख कोण असतो ? सुभाषिते रचणारेसुद्धा ते सरळ सांगत नाहीत. सांगणाऱ्यालाच लागू पडण्याची भीती. मूर्ख कोण? याचे उत्तर, मी नाही, एवढेच. शहाणा कोण ? याचे उत्तर मात्र, मी सोडून कुणीही नाही. असे बेधडक.

मूर्खासंबंधीची सुभाषिते वाचली की गंमत वाटते. मूर्खाची लक्षणे सहा– गर्वाने फुगलेला. शिवराळ. वाईटच बोलत राहणारा. उलटून बोलणारा उचित ते करणार नाही. नको तेच करेन हा हट्ट. वामन पंडितांचे भाषांतरित सुभाषित म्हणते, प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे। तृषाताची तृष्णा मृगंजल पिउनीहि वितळे।। सशाचेही लाभे विपीन फिरता शृंगहि जरी । परंतु मूर्खाचे हृदय धरावे ना क्षणभरी

येथे मूर्ख कोण ते सांगितलेले नाही. पण रगडून रगडून वाळूतून तेल काढणे, केव्हा ना केव्हा सशाचे शिंग सापडेल म्हणून रान तुडविणे. मृगजळाच्या मागे लागून तहान भागवायला मृगजळामागे पळणे, हे सगळे काय शहाणपणा करणे? या कृतीच मूर्खपणाच्या.

मुर्खाला मूर्ख म्हणणारा मूर्खच नाही का? कारण मूर्ख, मूर्ख होऊच शकत नाही. फक्त शहाणांच मूर्ख ठरू शकतो, कारण मूर्ख व्हायला आधी तो शहाणा असायला पाहिजे.

एक सुभाषित दुसऱ्या सुभाषिताला मूर्ख ठरवीत म्हणते, गुणांचा साठा अंगी असला की त्यात एक दोष खपून जातो, हे खोटे आहे. कारण मूर्खपणा हा एक दोष तर सगळ्या गुणांनाच नष्ट करतो.

पण जो गुणी असेल तो मूर्खपणाच कशाला करील? कुणी मूर्खपणा करतो असे म्हणणाराच मूर्ख ठरेल. दुसरा एक सुभाषितकार म्हणतो, जो आपली कामे सोडून दुसऱ्याची सेवा करतो, तो मूर्ख पण दुसऱ्यासाठी खपणे हे संतत्व.

सेवा करायला जाणे हा मूर्खपणा? स्वार्थच पाहत बसणे हा शहाणपणा ? इतरांना मूर्खपणा वाटला तरी आपण निर्भयपणे. आनंदाने जगण्याचा शहाणपणा सोडू नये. स्वतः शहाणपणाने जगले की, दुसऱ्याला मूर्ख म्हणणे कुठे उरले ? आनंदाने जगावे, दुसऱ्यालाही आनंदाने जगवावे.

– **किशोर गांधी**

# श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याच्या कार्यक्रम पत्रिकेचे पूजन करून विशाल गणपती चरणी अर्पण



नगर – येथील श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या वतीने शहरात प्रथमच नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष संजय जाधव व सौ.मंगला जाधव या दाम्पत्याच्या हस्ते ग्रामदैवत श्री विशाल गणपती समोर कार्यक्रम पत्रिकेचे विधीवत पूजन करून गणपतीस कार्यक्रम पत्रिका देण्यात आली. वेदमूर्ती विजय क्षीरसागर, गणेश भालेराव व ओंकार जगनाडे यांनी पौरोहित्य केले.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनभाई पटेल यांच्या हस्ते विशाल गणपती देवस्थानचे सचिव अशोक कानडे यांना कार्यक्रम पत्रिका देऊन वाटपाचा श्रीगणेशा करण्यात आला.

यावेळी श्री. कानडे यांनी श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या कार्याचा गौरव करताना शहरात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुरुषोत्तम पटेल, शरद झंवर, रामेश्वर बिहाणी, रविंद्र गुजराथी, पुरुषोत्तम नावंदर, नितीन मंत्री, डॉ. विजयकुमार भंडारी, मिलिंद चवंडके, हिरालाल पटेल, सोमनाथ नजान, बजरंग दरक, राजेंद्र खंडेलवाल, गोपाल मणियार, बाबुशेठ लोढा, कु.हर्षा गुजराथी उपस्थित होते.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मनियार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

नगरकरांनी विशेषतः युवकांनी दररोजच्या कथा निरूपणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनलाल पटेल, विश्वस्त पुरुषोत्तम पटेल, सुभाष जग्गी, श्रीगोपाल धूत, डॉ. विजय भंडारी, मधुसूदन सारडा, रवींद्र गुजराथी, शरद झंवर, हर्षल शहा, रामेश्वर बिहाणी, विजय पंजाबी तसेच निमंत्रित कार्यकारिणी मंडळ सदस्य सर्वश्री हिरालाल पटेल, पुरुषोत्तम नावंदर, विपुल शहा, बजरंग दरक, नितीन मंत्री, राहुल जामगांवकर, राजेश डागा, बालकिसन जाखोटिया, भगवान फुलसौंदर, सोमनाथ नजान, हर्षा गुजराथी, सल्लागार ॲड. शरद पलोड आणि डॉ. शरद कोलते यांनी केले आहे.

# कॉर्फबॉल प्रिमियम लीग (केपीएल) स्पर्धेत 'दिल्ली धुरंधर'ने 'आमची टायटन'ला नमवले

## दिशान गांधीच्या नेतृत्वात पुन्हा विजय



दिल्ली – त्यागराज इन्डोर स्टेडियम येथे चालू असलेल्या पहिल्याच कॉर्फबॉल प्रिमियम लीग (केपीएल) स्पर्धेत रविवारी नगरच्या दिशान किशोर गांधी याच्या नेतृत्वात दिल्ली धुरंधर संघाने मुंबईच्या आमची टायटन संघावर १९–७ अशा फरकाने सहज नमवत एकहाती विजय मिळवला.

दिशानच्या टिमचे संरक्षण व आक्रमण पाहण्यासारखे होते. सध्या तरी त्यांची टिम सर्वोत्तम असून गुणतालिकेतही प्रथम स्थानावर आहे. त्यांच्या संघाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंबरोबरचा त्यांचा समन्वय उत्कृष्ट होत चालला आहे. सोशल मिडीयावर व स्थानिक प्रेक्षकांचाही त्यांना प्रतिसाद लाभत आहे. यावेळी आम्ही सर्वश्रेष्ठ खेळ करण्याचा संकल्प दिशान गांधी याने व्यक्त केला.

उपांत्य फेरीचा त्यांचा प्रवेश जवळपास निश्चित झाला आहे.



महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कोकण विभाग यांच्या वतीने सुहास मुळे यांचा सत्कार करण्यात आला.

# जागतिक पर्यटन दिवसानिमित्त माळशेज घाट येथे अनोखा उपक्रम

नगर – महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व साज बाय लेक रिसॉर्ट या तारांकित हॉटेलच्या सहकार्याने विविध वन औषधी, आपण कधीही न पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या अशा चविष्ट आणि औषधी रानभाज्या, वन भाजीपाला, व आदिवासी लोकांनी विशिष्ट झाडांच्या काड्या, पाला पाचोळा, फांद्या आणि वाळलेले गवत यापासून पासून तयार केलेल्या सुंदर वस्तू, तेथील काही रुढी परंपरा, पारंपारिक गाणी आणि संगीत व वाद्य या सर्व गोष्टींचा समावेश करून एक सुंदर पर्यटन महोत्सव जागतिक पर्यटन दिवसा निमित्त अहिल्यानगर मधील लेखक संगीत समीक्षक सुहास मुळे यांच्या उपस्थितीमध्ये व तेथील ग्रुप ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच विजय काठे यांच्या पुढाकाराने, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या डोंगरावरील निसर्गरम्य वातावरणात झाला.

यावेळी येथील डोंगर दऱ्यांमधील अनेक वाड्यां वस्त्या मधून स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. अविनाश मोरे, राजेश टकले, प्रकाश शिंदे, श्रीराम जोशी, मोहिनीराज लहाडे, अशोक राजे निंबाळकर, योगेश गणगले, कीर्ती शहा, शशांक दिवेकर यांच्या हस्ते हॉटेल साज रिसॉर्ट लगतच्या पिंपळगाव जोगा तलाव परिसरामध्ये फळ झाडांचे बियांचे वाटप आणि वृक्षारोपण करण्यात आले. तसेच तिथे वाढत्या हॉटेलच्या आणि पर्यटकांच्या संख्येमुळे निर्माण झालेल्या अविघटनशील कचरा संकलन अभावामुळे निर्माण झालेली गंभीर प्रदूषण समस्या याविषयी स्थानिक लोकप्रतिनिधीं बरोबर वन सौंदर्य संपत्तीचे नैसर्गिक जतन करण्यासाठी स्थळदर्शन करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी सहकार्य करण्यासाठी साज हॉटेल प्रशासनाबरोबर चर्चा करण्यात आली.

# 'स्कायब्रिजचा राजा' गणेशोत्सवाची १२ दिवसांची पर्वणी उत्साहात



नगर – बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिजमध्ये 'स्कायब्रिजचा राजा'चा तृतीय वर्षाचा गणेशोत्सव १२ दिवसांच्या विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या उत्सवात धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, मनोरंजनात्मक आणि सामूहिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रहिवाशांचा उत्स्फूर्त सहभाग हे या उत्सवाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. श्री गणेश स्थापना, दररोजची आरती, सामूहिक क्षमापना, सत्यनारायण पूजा आणि सामूहिक भोजन या धार्मिक कार्यक्रमांसह खेळ, फन फेअर, तंबोला, अंताक्षरी, टॅलेंट हंट, ट्रेझर हंट यांसारख्या उपक्रमांनी उत्सवात रंगत आणली. दररोजची कलर थीम आणि पारंपरिक तसेच आधुनिक वेशभूषेमुळे उत्सवातील सहभागाला आणखी चालना मिळाली.

या गणेशोत्सवात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटांचा सहभाग दिसून आला. मुलांसाठी खेळ व मनोरंजनात्मक उपक्रम, तरुणांसाठी विविध स्पर्धा, महिलांचा सांस्कृतिक कार्यक्रमांतील सहभाग तसेच कुटुंबांसाठी सामूहिक उपक्रम यामुळे उत्सवाला सर्वसमावेशक स्वरूप प्राप्त झाले. दररोजच्या आरतीच्या निमित्ताने रहिवासी एकत्र येत होते. दैनंदिन जीवनापेक्षा वेगळा वेळ कुटुंबीय आणि शेजाऱ्यांसोबत घालवण्याची संधी या उत्सवाच्या माध्यमातून मिळाली.

गणेशोत्सवातील पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांसोबत आधुनिक सामुदायिक उपक्रमांची सांगड घालण्यात आली. सर्वांना सामूहिक सहभाग आणि सामाजिक संवादाचे व्यासपीठ मिळाले. कुटुंबांमधील संवाद आणि मुलांमधील मैत्री वाढण्यासही हातभार लागला. 'स्कायब्रिज फॅमिलीची संकल्पना अनुभवातून अधोरेखित आजच्या शहरी जीवनात एकाच परिसरात राहणाऱ्या कुटुंबांमध्ये प्रत्यक्ष संवादासाठी वेळ कमी होत असताना, अशा सामूहिक उत्सवांमुळे रहिवाशांना एकत्र येण्याची संधी मिळते. अनंत चतुर्दशीला भावपूर्ण वातावरणात श्री गणेश विसर्जन करण्यात आले. पुढच्या वर्षी लवकर या असे साकडे गणरायाला घालण्यात आले. या संपूर्ण उत्सवातून स्कायब्रिज येथील सामूहिक जीवनाची एक महत्त्वाची बाजू समोर आली. घराची संकल्पना केवळ वैयक्तिक निवासस्थानापुरती मर्यादित राहत नाही; त्या घराभोवती निर्माण होणारी माणसे, नाती आणि सामाजिक वातावरणही तितकेच महत्त्वाचे ठरते. १२ दिवसांच्या उत्सवाची सांगता झाली असली, तरी त्यातून निर्माण झालेल्या आठवणी आणि नात्यांचा ठेवा रहिवाशांसोबत राहणार आहे.

## रामकृष्ण सेवा ट्रस्ट आयोजित शिवचरित्र कथा

# स्वामी गोविंद देवगिरीजींच्या वाणीचा तरुणांनी लाभ घ्यावा



**''शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप''**

होय छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. एक परिपूर्ण आदर्श राजा. नव्या पिढीच्या नव युवकांना त्यांच्या जीवन संघर्षाचा स्वराज्य निर्मिती व आदर्श अशा धर्मराज्य शासन मूल्यांचा नव्याने व सखोल अभ्यास व्हावा या हेतूने या शिवचरित्र कथेचे आयोजन शहरात चार दशकांपासून वैष्णव परिवाराच्या श्रीराम कृष्ण सेवा ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे. स्वामी गोविंद देवगिरीजींच्या संकल्पनेतून २९ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर पर्यंत या शिवचरित्र कथेचा लाभ त्यांच्या समृद्ध वाणीतून श्रवण करण्याची तरुणांना सुवर्णसंधी आहे. आजच्या शासन प्रशासन व राजकीय सामाजिक वातावरणात शिवचरित्राची जाण अधिक महत्त्वाची व अत्यावश्यक आहे.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट १९८३ साली परमपूज्य रामचंद्र डोंगरे महाराज यांच्या नगर मधील श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यातून मिळालेल्या प्रेरणेतून श्रीराम कृष्ण सेवा ट्रस्टची स्थापना झाली. रामकृष्ण ट्रस्ट चे पहिले अध्यक्ष कै. रामनाथ धूत होते सध्या नंदलाल मनियार ही धुरा यशस्वीपणे पार पाडत आहेत. वैष्णव परिवाराने एकत्र येऊन केवळ श्रद्धा सेवाभाव आणि भक्तीच्या पाठबळावर आजपर्यंत धर्मप्रभावना रुजवण्याचे वाढवण्याचे कार्य केले आहे. विविध कथा ज्ञान यज्ञांच्या माध्यमातून भारतीय संस्कृती समाज संघटन भक्कम करण्याची मोठी कामगिरी ट्रस्टने केली आहे. १९८५ पासून ट्रस्टचे अजीवन सदस्य परिवारांचे शरद पौर्णिमेच्या नितांत सुंदर रात्री परिवार मिलन करतात. श्रीकृष्ण भक्तीत अनेक कार्यक्रमांच्या रेलचेलीमध्ये महाप्रसाद व परिपूर्ण चंद्राच्या साक्षीने अमृतमय दुग्धपान करतात. ट्रस्टने उज्वल भविष्याचा विचार करताना २००३ मध्ये युवा व महिला संघटनेची स्थापना केली यातून नव्या पिढी सह महिलांना पुढे येण्याची नेतृत्व करण्याची संधी मिळाली. आजपर्यंत परमपूज्य डोंगरे महाराज, परमपूज्य आचार्य किशोरजी व्यास, गोस्वामी इंदिरा बेटी, पूज्य रमेश भाई ओझा, गोपालक राधाकृष्णजी महाराज, ह भ प मुकुंद काका चाटदेवळेकर, हभप भास्करगिरी महाराज आदी महानुभवांनी ज्ञानगंगेत श्रोत्यांना ओलेचिंब केले.

१९९९ पासून श्री संत दर्शन सप्ताहातून अनेक संतांचे जीवन चरित्र ऐकायला मिळाले. ट्रस्टच्या वाढत्या कामासाठी वैद्यकीय सेवा सुविधांसाठी श्री रामकृष्ण मेडिकल फाउंडेशन ची निर्मिती करण्यात आली. थोडक्यात शहराच्या धार्मिक भावनांच्या समृद्धीत श्रीराम कृष्ण सेवा ट्रस्टने मोलाची भर टाकली आहे.

श्रीगोविंद देवगिरीजी स्वामी आपली भूमी साधू संतांची पावन पवित्र भूमी आहे. यातच बेलापूर, श्रीरामपूर येथे स्वामीजींचा जन्म झाला. मूळचे नाव किशोर मदन गोपाल व्यास उर्फ आचार्यश्री किशोरजी व्यास. तत्त्वज्ञानात पदवीधारक स्वामीजींनी वयाच्या केवळ सतराव्या वर्षापासून देश विदेशात भारतीय संस्कृती, रामायण, महाभारत, संत दर्शना द्वारे आणि सप्ताह प्रवचने केली. २००६ मध्ये त्यांनी परमहंस संन्यास स्वीकारला व त्यांचे नामकरण परमपूज्य गोविंद देवगिरी स्वामी महाराज असे झाले. सध्या ते सर्वांना अधिक सुपरिचित झाले आहेत कारण अवघ्या हिंदूंचे अन् भारतीयांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री राम जन्मभूमी अयोध्या तीर्थक्षेत्र ट्रस्टचे ते महामंत्री (सचिव) आहेत. आपल्या जिल्ह्याच्या या कर्तृत्ववान स्वामीजींचा सर्वांना निश्चितच आनंद व अभिमान आहे.

बालपणी रामकथेतून निती शिकावी तारुण्यात महाभारतातून युक्ती शिकावी प्रौढावस्थेत भागवतातून भक्ती शिकून मुक्ती मिळवावी असे म्हणतात. तरी पण याच कार्यकर्तृत्व करू पाहणाऱ्या तारुण्यात व पूर्ण जीवनात छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र ही ऐकावे, पहावे ज्यातून आदर्श राजा, आदर्श राज्यकारभार, सामाजिक दायित्व, युद्धनीती, राष्ट्राभिमान व्यवस्थापन तत्वे इत्यादी गुणांचा अभ्यास अवलोकन करता येईल. म्हणूनच नंदनवन लॉन येथे होणाऱ्या या भव्य राज्याभिषेक सोहळ्यासारख्या नेत्रदीपक कार्यक्रमांचा व कथेचा लाभ विशेष करुन तरुणांनी घ्यावा खऱ्या आदर्श राजाची जीवनकथा जाणून घ्यावी या कथा चरित्र सोहळा निमित्त आमच्याही शुभेच्छा...!

– **किशोर गांधी** (दिशान फिचर्स) सदस्य – श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट

# 'नर्मदा परिक्रमे'ला आत्म्याला मुक्तीची साधना मानली जाते



राजेंद्र मुनी

नगर – शास्त्रानुसार गंगा स्नानेन मुच्यते नर्मदा दर्शनात म्हणजेच गंगेत स्नान केल्याने जी पाप नष्ट होतात, ती पाप केवळ नर्मदा मातेच्या दर्शनानेच नष्ट होतात. नर्मदा नदीचा उगम भगवान शंकराच्या तपश्चर्येतून व घामाच्या थेंबातून झाला म्हणून तिला शिवाची कन्या व जिवित देवी मानले जाते, असे प्रतिपादन संत स्वामी राजेंद्र मुनी यांनी केले. अहिल्यानगर येथील गायत्री मंदिरात नर्मदा परिक्रमाचे संमेलन संपन्न झाले.

दरवर्षीप्रमाणे पायी नर्मदा परिक्रमा करणाऱ्या परिक्रमा इच्छुक साधकांसाठी माहिती, उद्बोधन परिसंवाद आयोजित करण्यात आला होता यावेळी नर्मदा परिक्रमाचे नियम मार्ग कधी करावी याबाबत सविस्तर माहिती दक्षिण तट नर्मदाखंड हरदा जवळील हंडिया नजीक ग्राम भमोरी येथील संत स्वामी राजेंद्रमुनी यांनी देऊन सुंदर मार्गदर्शन केले.

प्रथम नर्मदा परिक्रमा का करावी, महत्व याबद्दल माहिती दिली. त्यानंतर परिक्रमा काळात आश्रमात परिक्रमा करणाऱ्या साधकांनी कसे वर्तन ठेवावे हे दाखले देत स्पष्ट केले. परिक्रमा आणि पंढरपूर वारी याचा फरक स्पष्ट केला. वारी ही पांडुरंग (विठ्ठल) भक्ती साठी पुन्हा पुन्हा करावी हे सांगितले. तसेच नर्मदा परिक्रमा ही शिवपुत्री नर्मदमातेची आत्मसाधना, आत्म संयम, विजनवास (एकट्याने) भक्ती साधना आहे. त्यात संसारी, प्रापंचिक साधकांनी कसा अभ्यास करत त्याग करत सेवासाधना करत परिक्रमेचे फलित सांगितले. उपस्थितांच्या प्रश्नाला उत्तर देताना संकल्प काय करावा. नित्यउपासना महत्व सांगितले.

यावेळी साधकांनी शंका उपस्थित केली. त्या सर्वांना समाधान कारक उत्तर राजेंद्र मुनी यांनी दिले शेवटी श्री नर्मदा माईची आरती,अष्टक व कढाई प्रसाद वाटप करण्यात आले.

# दि अंबिका महिला बँकेच्या सभासदांना १३ टक्के लाभांश जाहीर

## ठेवीवर ८ टक्के व्याज मिळणार : अध्यक्षा सौ. शांता मोरे यांची माहिती



नगर – दि. अंबिका महिला सहकारी बँकेचे आर्थिक वर्ष सन २०२६–२०२७ ची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २६ सप्टेंबर २०२६ रोजी लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, टिळक रोड, अहमदनगर येथे बँकेच्या अध्यक्षा सौ. शांता भिमराज मोरे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. बँकेच्या अध्यक्षा सौ. शांता मोरे यांनी स्वागत करून बँकेस अहवाल सालातील उत्तम कामगिरी बददल दि. महाराष्ट्र अर्बन को–ऑप बँक्स फेडरेशन लि, मुंबई यांचा राज्यातील महिला बँक गटातुन सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६ मिळाला आहे. अशी माहिती अध्यक्षांनी दिली त्याबद्यल सर्व उपस्थित सभासदांनी संचालिका मंडळाचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले.

बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई काळे यांनी अहवालपर मार्गदर्शन करून सहकारी बँकापुढील आव्हाने व उपलब्ध संधी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना सभासद ग्राहक जागृकता, सभासद अधिकार, जबाबदाऱ्या कर्तव्य व आपल्या बँकेची वाटचाल याबाबत माहिती दिली. नुकतीच बँकेच्या संचालिका मंडळावर सौ. शिल्पा वाघ, प्रा. सौ. वैशाली मरकड, प्रा. सौ. आरती मांढरे, डॉ. दिपाली अनभुले यांची नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे संचालक मंडळाने दिर्घकाळ व्यवसाय वाढ नियोजन आराखडा मंजूर केला असून पुढिल आर्थिक वर्षात एकूण व्यवसाय २६४.०६ कोटी होईल अशी अपेक्षा आहे. यास सभेने मान्यता द्यावी अशी विनंती केली.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड यांनी वार्षिक सभेच्या नोटीशीचे वाचन केले. बँकेच्या अध्यक्षा सौ. शांता मोरे यांनी विषयानुसार आर्थिक वर्षातील कामकाज माहिती देवून विषयानुसार विवेचन केले. आर्थिक वर्षा अखेर बँकेचा एकूण व्यवसाय रू. २१८.५५ कोटी, एकूण ठेवी रू. १२७.९५ कोटी असून कर्ज वितरण रू. ९०.६० कोटी आहेत. बँकेचे वसुल भागभांडवल रू. ३.४६ कोटी असून खेळते भांडवल रू. १४९.६८ कोटी रू. आहे. तसेच बँकेचे नेटवर्थ १४ कोटी ७८ लाख आहे. बँकेची एकुण गुंतवणुक ५०.९३ कोटी आहे. सी. आर. ए. आर २०.५२%, नक्त एन. पी. ए. ०.०% टक्के, नियमित लेखापरिक्षण वर्ग अ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे Eligibility Criteria for Business uthorization (ECBA) चे सर्व निकष बँक पुर्ण करत आहे. या सर्व बाबी बँकेची अहवाल सालातील प्रगती दर्शवितात. तसेच वसुलीबाबत संचालक मंडळाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देवून क्रियाशील सभासदांच्या सहकार्यामुळे बँकेचा नक्त एन. पी. ए. ०.०% टक्के राखण्यात बँकेला यश आले आहे. सध्यस्थितीत ग्राहकांसाठी ठेवीवरील व्याजदर ८% करण्यात आलेला आहे. सभासदांना मागील अनेक वर्षासह यावर्षीही १३% लाभांश देणारी जिल्ह्यातील एकमेव महिला बँक आहे. तरी सभेपुढिल सर्व विषय मंजूर करावेत अशी अध्यक्षानी विनंती केली. उपस्थित सभासदांनी सभेपुढील सर्व विषयांना सर्वानुमते मंजूरी दिली.

कायद्यातील तरतुदी प्रमाणे स. म. गोपाळराव सोले पाटिल सहकार प्रशिक्षण केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने वार्षिक सभा समाप्ती नंतर सर्व सभासदांसाठी सध्याचे बँकीग क्षेत्रात होत असलेले बदल व सभासद जागरूकता, सायबर सुरक्षा, बँकेच्या कामकाजातील सहभाग, सभासदांचे अधिकार व जबाबदाऱ्या यासह आवश्यक तरतुदीच्या माहितीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर प्रशिक्षण देण्यासाठी प्रा. एस. एन. साखरे उपस्थित होते.

बँकेच्या संचालिका प्रा. सौ. मिरा पठारे, सभासद सौ. शकुंतला पाटील, सौ. प्रियदर्शनी आठरे, सौ. वैशाली खरपुडे, उद्योजक सौ. मनिषा खामकर, प्रा. श्रीमती. मंगल तवले यांनी सभेच्या कामकाजात उत्स्फुर्त सहभाग घेतला. तसेच बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या अध्यक्षा डॉ. प्रा. सौ. संध्या जाधव, संचालिका सौ. आशा मिस्कीन, ॲड. सौ. शारदा लगड, सौ. भारती आठरे, सौ. शोभना चव्हाण, सौ. शोभा खरपुडे, तज्ज्ञ संचालक सी.ए ज्ञानेश्वर काळे, सेवक प्रतिनिधी सुभाष म्हस्के, निलेश जगताप तसेच BOM चे सदस्या सौ. विजया पाटिल, सौ. करूणा काळे, मुरलीधर कुलकर्णी, ककरंट ऑडीटर सी. ए. घनश्याम सोलंकी यांनी आर्थिक वर्षात केलेले कामकाज व अभिप्राय मौलिक ठरले. बँकेमुळे अनेक महिला सभासदांना आर्थिक सहाय्य व बँकेच्या सेवाचा लाभ होवून रोजगार उपलब्ध झालेला आहे. आज बँकेची भक्कम आर्थिक स्थिती, वाढता नावलौकिक, मिळत असलेल्या ग्राहक सेवा, कामकजातील पारदर्शकता याबाबत उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त केले.

बँकेच्या उपाध्यक्षा व मुख्याध्यापिका सौ. सुमन गोसावी यांनी अहवाल सालात अध्यक्षांनी सौ. सरोजिनी चव्हाण व उपाध्यक्षा ॲड. विजया काकडे यांनी उत्तम कामगिरी केली. त्याचप्रमाणे अहवाल सालात अनेक सभासद, ग्राहक व मान्यवरांनी सहकार्य केले. मंगेश सुरवसे, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरिक्षक कार्यालय, विविध बँका, विविध दैनिक वृत्तपत्रे आणि मा. संचालिका मंडळ, उपमुख्याधिकारी सौ. रोहिणी शेळके व सर्व सेवक वृंद आदींचा प्रामुख्याने उल्लेख करून त्यांचे प्रती आभार व्यक्त केले.

# कोहिनूर मॉल येथे २ ते ५ ऑक्टोबर दरम्यान वेडिंग एक्स्पो

## लग्न कार्याची संपूर्ण खरेदी व नियोजन एकाच छताखाली, नामांकित ब्रँण्डचा सहभाग




नगर – घरात मंगलकार्य ठरले की बस्त्यापासून सोने खरेदी, मंडप डेकोरेटर्स, केटरर्स ते फोटोग्राफी अशा सर्वच गोष्टींसाठी धावपळ सुरू होते. किती तरी दिवस आधीच या गोष्टींचे नियोजन केले जाते.

नगरमधील कोहिनूर वस्त्र दालन लग्न बस्त्यासाठी संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. सावेडी रोडवरील कोहिनूर मॉल येथे लग्नं बस्त्याची सुविधा आहे. या जोडीला आता कोहिनूर वेडिंग एक्स्पो आयोजित करण्यात आला आहे. २ ते ५ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या या एक्स्पोमध्ये लग्न कार्याशी निगडित सर्व गोष्टी एकाच छताखाली उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे लग्न सोहळ्याचे संपूर्ण प्लानिंग व खरेदी एकाच ठिकाणी करता येणार आहे, अशी माहिती संचालक अश्विन गांधी यांनी दिली.

नववधू, नवरदेवाने खास पोशाख, बस्त्यासाठी कोहिनूर वस्त्रदालन, सुवर्ण अलंकारांसाठी एस.जी. कायगांवकर ज्वेलर्स, बॉलिवूड सेलिब्रिटी फॅशन स्टायलिस्ट विकास राठोड, पर्ल आहुजा मेकअप आर्टिस्ट, नाऊ ॲण्ड फॉरेव्हर फोटोग्राफी, अन्नपूर्णा केटरर्स, गिफ्टसाठी मॉडर्न क्राफ्ट, एके इव्हेंट प्लॅनर असे नामांकित ब्रँण्ड कोहिनूर मॉल येथे असणार आहेत. संपूर्ण लग्न कार्याचे नियोजन एकाच ठिकाणी करता येईल. त्यामुळे वेळेची मोठी बचत होऊन ऐनवेळेस होणारी धावपळ टळणार आहे. मेट्रो सिटीतील वेडिंग एक्स्पो संकल्पना नगरमध्ये प्रथमच कोहिनूर मॉल येथे प्रत्यक्षात येत आहे.

कोहिनूर वस्त्रदालनाला जवळपास नऊ दशकांची परंपरा आहे. लग्न बस्त्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून ग्राहक विश्वासाने याठिकाणी खरेदीसाठी येतात. या ग्राहकांना लग्न कार्यातील आवश्यक सोने खरेदी, केटरर्स, मेकअप, फोटोग्राफी, इव्हेंट मॅनेजमेंट, गिफ्ट ही खरेदीही एकाच ठिकाणी करता यावी यासाठी नामांकित ब्रँण्ड वेडिंग एक्स्पोमध्ये सहभागी होत आहेत. बॉलिवूड सेलिब्रिटींचे स्टायलिस्ट म्हणून ओळख असलेले विकास राठोड लग्न सोहळ्यात वधूवरासह कुटुंबातील प्रत्येक सदस्याला स्टाईलिश वेअरसाठी अनुभवी मार्गदर्शन करतील आधुनिक फॅशनचे कपडे डिझाईन करून देतील. याठिकाणी अतिशय निवांत व आरामदायी वातावरणात ग्राहकांना घरातील मंगल कार्याचे सर्व नियोजन करता येईल.

# भिंगार अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत; १५ टक्के लाभांश जाहीर

## सभासदांच्या विश्वासामुळे भिंगार अर्बन बँक प्रगतीपथावर : चेअरमन अनिलराव झोडगे




भिंगार अर्बन को–ऑप बँक लि.ची वार्षिक सर्वसाधारण सभा भाग्यलक्ष्मी सांस्कृतिक भवन, भिंगार येथे खेळीमेळीचे वातावरणात पार पडली. यावेळी बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, व्हा.चेअरमन किसनराव चौधरी.

नगर – सभासदांच्या विश्वासामुळे भिंगार अर्बन बँक प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. बँकेच्या माध्यमातून आजपर्यंत घेण्यात आलेल्या प्रत्येक निर्णयात सभासदांचे व खातेदार आणि ठेवीदार यांच्या हिताचे निर्णय घेतल्यामुळे प्रत्येक व्यक्ती बँकेवर विश्वास ठेवत आहे, आणि त्या विश्वासाला आम्ही संचालक मंडळ कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही चेअरमन अनिलराव झोडगे यांनी दिली आहे.

भिंगार अर्बन को–ऑप बँक लि.ची ११८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भाग्यलक्ष्मी सांस्कृतिक भवन, भिंगार येथे खेळीमेळीचे वातावरणात पार पडली. यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णू फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, तिलोत्तमाबाई करांडे, अनिता भुजबळ, रामसुख मंत्री, राजेन्द्र बोरा, व्यवस्थापक शशिकांत महाजन व सभासद उपस्थित होते.

पुढे बोलतांना अनिलराव झोडगे यांनी स्वागत करतांना बँकेची आर्थिक स्थिती विषद करतांना सांगितले की, अल्पावधीमध्ये बँकेने मोठी प्रगती केली आहे. मार्च २०२६ अखेर बँकेला ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे. कर्जामध्ये वाढ झाली असून, वसुलीचे कामही सक्षमपणे होत आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. खातेदारांचा व सभासदांचा बँकेवर असलेल्या दृढ विश्वासामुळेच ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. तसेच युपीआय क्युआर कोड व मोबाईल बँकिंग सेवाही ही सर्व शाखांमध्ये सुरु आहे

यावेळी किसनराव चौधरी म्हणाले की, भविष्यात बँकेच्या ठेवी. वाढविणेचे उद्दिष्ट बँकेने ठेवले आहे. बँकेच्या आठ शाखा सध्या चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. सर्व शाखांमध्ये २४ तास ए.टी.एम. सुविधा कॅश डिपॉझिटसह, आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी., लॉकर्स सुविधा बाहेरगावचे डी.डी. सुविधा दिल्या जात आहेत. सर्व शाखा ऑनलाईनने जोडल्या आहेत. तसेंच, बँके मार्फत मोबाईल बँकिंग सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देण्यांत आली आहे तत्पर सेवक वर्ग व संचालक मंडळ सचोटीने कामकाज करीत आहेत.

यावेळी शशीकांत महाजन यांनी सभेच्या नोटीसचे वाचन करुन, नोटीसीतील विषयांना सभासदांची मंजुरी घेतली. तसेच बँकेच्या वेगवेगळ्या योजनांचा फायदा करून घेण्याचे आवाहन केले. तसेच या वर्षी बँकेने एकूण चांगली कामगिरी केली आहे. आठ शाखेच्या माध्यमातून कामकाज सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

संचालक कैलास रासकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी किसनराव चोधरी यांनी आभार मानले.

तसेच सहकार प्रशिक्षण केंदाचे वतीने सुनील साखरे यांनी मार्गदर्शन केले तसेच सभासद यांचे गुणवंत पाल्य यांचा विविध क्षेत्रातील कामगिरीबद्दल यावेळी सन्मान करण्यात आला.

# अहमदनगर मर्चंटस बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

## सभासदांना ५१०० रूपयांच्या ठेव पावतीची भेट देणार : चेअरमन संजय चोपडा



अहमदनगर मर्चंट्स को ऑप बँकेची ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती देताना चेअरमन संजय चोपडा.




नवी दिल्ली स्थित जैन कॉन्फरन्सचा 'जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान' मिळाल्याबद्दल हस्तीमल मुनोत यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

नगर – अहमदनगर मर्चंट्स को ऑप बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा केशर गुलाब मंगल कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. चेअरमन संजय चोपडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना चर्चे अंती सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन २०१४ पूर्वीच्या सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती भेट देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत व मान्यवरांच्या हस्ते ठेव पावती वाटपाचा शुभारंभ लवकरच करण्यात येणार आहे.

संजय चोपडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस हस्तीमल मुनोत, व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक आनंदराम मुनोत, सी.ए.मोहन बरमेचा, किशोर गांधी, संजय बोरा, सी.ए.आयपी अजय मुथा, संजीव गांधी, कमलेश भंडारी, किशोर मुनोत, मिनाताई मुनोत, प्रमिलाताई बोरा, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, सी.ए.प्रविण कटारिया, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी आदींसह सभासद उपस्थित होते.

सभेत हस्तीमल मुनोत यांना नवी दिल्ली स्थित जैन कॉन्फरन्सचा 'जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान' मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तसेच उद्योगपती सौरभ बोरा यांना समाज रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या 'हमसफर' शॉर्ट फिल्मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल, बँकेचे संचालक सीए आयपी अजय मुथा यांची आयसीएआय, नवी दिल्लीच्या डायरेक्ट टॅक्स समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, तसेच दिशान गांधी याने कॉर्फबॉल खेळाच्या मे महिन्यात झालेल्या विश्वचषक स्पर्धेत भारताकडून नेत्रदीपक कामगिरी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

प्रारंभी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी यांनी अहवाल वाचन केले व विषयपत्रिकेवरील विषयांची माहिती दिली.

चेअरमन संजय चोपडा म्हणाले, बँकेचा कारभार हस्तीमल मुनीत यांच्याशी तत्वानुसार व मार्गदर्शनानुसार सुरू आहे. बँकेचे ३१ मार्च २०२६ अखेर वसूल भागभांडवल १९ कोटी २२ लाखांचे असून राखीव व इतर निधी २७१ कोटी ८० लाखांचे आहे. मागील आर्थिक वर्षात बँकेचा सीआरएआर १७.९४ टक्के आहे. एसएलआरमध्ये गुंतवणूक ३९१ कोटी २६ लाखांची आहे तसेच नॉन एसएलआर गुंतवणूक व मुदत ठेवी २४० कोटी ९९ लाखांच्या आहेत. बँक भक्कम अशा आर्थिक पायावर उभी आहे. बँकेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांचाही सिंहाचा वाटा आहे. यानिमित्त प्रती कर्मचारी १० हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात आले आहे.

अहवाल वर्षात कर्जावरील व्याजातून मिळालेल्या उत्पन्नाच्या तुलनेत २२.०६ टक्के प्रमाणात रिबेट देण्यात आलेला आहे. बँकेने रुपये ७४४.२६ लाखांचा निव्वळ नफा मिळवला आहे. आवश्यक तरतुदी केल्यानंतर सभासदांना १५ टक्के लाभांश दिला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांच्या ठेव पावतीची संस्मरणीय भेट दिली जाणार असून यासाठी आवश्यक परवानगी मिळाली आहे. या परवानगीसाठी आमदार संग्राम जगताप, त्यांचे स्वीय सहाय्यक अनुप काळे, सभासद राजेंद्र गांधी, बँकेचे प्रभारी सीईओ नितीन भंडारी यांचे तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचेही सहकार्य लाभले.

बचत ठेव खातेदारांच्या अपघाती निधनामुळे त्यांच्या वारसदारांना प्रत्येकी रक्कम रूपये २ लाख प्रमाणे देण्यात आलेली आहे. आजच्या डिजिटल युगात ग्राहकांना जलद, सुरक्षित आणि आधुनिक बँकिंग सेवा मिळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपल्या बँकेने सर्व प्रकारच्या डिजिटल सेवा–सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बँक एक मोठी आर्थिक संस्था म्हणून उभी असून अहिल्यानगरच्या वाटचालीमध्ये बँकेचा फार मोठा वाटा आहे.

हस्तीमल मुनोत म्हणाले, उत्कृष्ट आर्थिक कारभाराची परंपरा बँकेने सातत्याने कायम राखली आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्यात बँक यशस्वी झाली आहे. जैन कॉन्फरन्सचा राष्ट्रीय सन्मान मिळणे माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्षेत्रात काम करताना अनेकांचे सहकार्य लाभत असते. बँकेचे सर्व सहकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी, सभासद यांचीही मोलाची साथ मला कायम मिळाली आहे.

वार्षिक सभेत सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

# 'आनंदऋषीजी नेत्रालया'मधील डॉक्टरांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

## राष्ट्रीय बाल नेत्ररोग तज्ज्ञांच्या परिषदेत ई पोस्टरला प्रथम पुरस्कार



डॉ. निरंजन पेहेरे



डॉ. विमल राजपूत

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या गुणवत्तापूर्ण सेवेचा देशपातळीवर गौरव झाला आहे. नेत्रालयातील रुग्णाच्या एक अवघड तिरळेपणा केसवर आधारित ई पोस्टर सादरीकरणाला राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्कार मिळाला आहे. आनंदऋषीजी नेत्रालयातील डॉ. निरंजन पेहेरे आणि डॉ. विमल राजपूत यांनी आपल्या रुग्णाच्या केसवर आधारित ई पोस्टर नॅशनल पेडियाट्रीक ऑप्थोल्मोलॉजीस्ट असोसिएशनकडे सादर केले होते. १८ ते २० सप्टेंबर दरम्यान भुवनेश्वर येथे आयोजित बाल नेत्ररोग तज्ज्ञांच्या राष्ट्रीय परिषदेत या ई पोस्टरला प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. ही उल्लेखनीय कामगिरी आनंदऋषीजी नेत्रालयातील वैद्यकीय तज्ज्ञांचे ज्ञान, संशोधन वृत्ती आणि उत्कृष्ट रुग्णसेवेप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करते. राष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे आनंदऋषीजी नेत्रालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशाबद्दल डॉ. निरंजन पेहेरे आणि डॉ. विमल राजपूत यांचे आनंदऋषीजी नेत्रालय परिवारातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे. आनंदऋषीजी नेत्रालय उत्कृष्ट रुग्णसेवेसोबत ज्ञान, संशोधन आणि वैद्यकीय गुणवत्तेची सातत्यपूर्ण वाटचाल करत आहे.

# निरोगी व सदृढ समाजाचे मिशन घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे उपक्रम

## वसंतलाल चोपडा यांचे प्रतिपादन; बालरोग व थॅलेसेमिया तपासणी शिबिरात ९१ बालकांची मोफत आरोग्य तपासणी; दर महिन्याला २१० थॅलेसेमियाग्रस्त बालकांवर मोफत उपचार



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने बालरोग व थॅलेसेमिया तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंतलाल चोपडा, सुभाष मुनोत, अलका मुनोत, संतोष बोथरा, प्रकाश छल्लाणी, सतीश लोढा आदी.

नगर – निरोगी व सदृढ समाजाचे मिशन घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सातत्याने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जात आहेत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रुग्णसेवा पोहोचविण्यासाठी विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आधार देण्याचे काम सुरू आहे. बालकांचे विविध आजार व आरोग्य तपासण्या एका छताखाली उपलब्ध करून देत नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यात येत असल्याचे वसंतलाल चोपडा यांनी सांगितले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने बालरोग व थॅलेसेमिया तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंतलाल चोपडा बोलत होते. यावेळी सुभाष मुनोत, अलका मुनोत, संतोष बोथरा, प्रकाश छल्लाणी, सतीश लोढा, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिल गुट्टे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल, डॉ. लिझा बलसारा, डॉ. रुपेश सिकची आदी उपस्थित होते.

डॉ. लिझा बलसारा म्हणाल्या की, थॅलेसेमिया ग्रस्त बालकांसाठी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार सुविधा उपलब्ध आहे. इतर आजारांसाठी अल्पदरात विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच बोन मॅरो ट्रान्सप्लांटही यशस्वी करण्यात आले असून, संबंधित बालक निरोगी जीवन जगत असल्याचे त्यांनी सांगितले.

बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिल गुट्टे यांनी जन्मजात कमी वजनाच्या बालकांसाठी एनआयसीयू सेंटरमध्ये विशेष काळजी घेतली जाते. अशा बालकांची योग्य निगा राखून त्यांची उत्तम प्रकारे वाढ केली जाते. जिल्ह्यात सर्व सुविधायुक्त एनआयसीयू सेंटर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

डॉ. वैभवी वंजारे म्हणाल्या की, मागील १७ वर्षांपासून सेवा देत असताना बालकांच्या आरोग्यासाठी आरोग्य यंत्रणेत सातत्याने अपडेट करून नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्याचा हॉस्पिटल प्रशासनाचा प्रयत्न राहिला आहे. बालकांसाठी सकस आहार तसेच मोबाईल डिक्शनच्या समस्यांबाबत पालकांना मार्गदर्शन केले जाते. सर्व प्रकारच्या लसीकरणाची सुविधा अल्पदरात उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

या मोफत बालरोग तपासणी शिबिराला नागरिक व पालकांचा प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये एकूण ९१ बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ बालरोग डॉक्टरांनी बालकांची तपासणी करून आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# अर्थजगत

■ माहीत आहे?



## पैसा व्यवस्थापनाचे मानसशास्त्र

**पगार वाढतो, उत्पन्न वाढते; पण महिनाअखेरीस खात्यात शिल्लक फारशी राहत नाही. दुसरीकडे आपल्यापेक्षा कमी उत्पन्न असलेली व्यक्ती नियमित बचत करते, गुंतवणूक वाढवते आणि आर्थिकदृष्ट्या अधिक सुरक्षित दिसते. हा फरक केवळ उत्पन्नातील नसतो. पैशांशी असलेले वर्तन, खर्चाच्या सवयी, जोखीम घेण्याची पद्धत आणि संयम यांचा त्यात मोठा वाटा असतो. पैशांचे व्यवस्थापन हे गणिताइतकेच मानसशास्त्राशी जोडलेले आहे, हा 'द सायकॉलॉजी ऑफ मनी' या पुस्तकाचा मध्यवर्ती विचार आहे.**

**१. आर्थिक यशासाठी हुशारीपेक्षा शिस्त :** शेअर बाजाराचे बारकावे समजणारी किंवा आर्थिक गणितात तरबेज व्यक्तीच मोठी संपत्ती निर्माण करेल असे नाही. जास्त उत्पन्न असूनही अनावश्यक कर्ज, अवाजवी खर्च किंवा बाजार पडताच घाबरून गुंतवणूक विकण्याची सवय असेल, तर संपत्ती निर्माण होणे कठीण होते. याउलट नियमित बचत, नियंत्रित खर्च आणि दीर्घकालीन गुंतवणुकीची शिस्त असलेली व्यक्ती कालांतराने मोठा निधी उभारू शकते.

**२. श्रीमंत दिसणे आणि श्रीमंत असणे :** महागडी कार, ब्रँडेड वस्तू किंवा परदेशी सहली आर्थिक सुबत्तेचे निश्चित मोजमाप नाहीत. ₹५० लाखांची कार दिसते; पण ती खरेदी करणाऱ्या व्यक्तीवर किती कर्ज आहे किंवा तिच्याकडे किती बचत आहे, हे दिसत नाही. प्रत्यक्ष संपत्ती म्हणजे भविष्यासाठी शिल्लक ठेवलेली बचत आणि मालमत्ता. त्यामुळे दुसऱ्यांचे जीवनमान पाहून आपल्या आर्थिक क्षमतेबाहेर खर्च करण्याची सवय दीर्घकालीन संपत्तीला मारक ठरू शकते.

**३. पैशाला वाढण्यासाठी वेळ द्या :** चक्रवाढीची खरी ताकद वेळेत दडलेली असते. गुंतवणुकीवर मिळालेला परतावा पुन्हा गुंतवला की त्यावरही परतावा मिळू लागतो. ही प्रक्रिया जितकी अधिक काळ सुरू राहते, तितका परिणाम मोठा होऊ शकतो. वारंवार गुंतवणूक बदलणे किंवा दर काही महिन्यांनी अधिक परताव्याच्या पर्यायामागे धावणे या प्रक्रियेत अडथळा आणू शकते.

**४. संकटासाठी स्वतंत्र पैसा ठेवा :** आर्थिक नियोजन करताना सर्व काही ठरल्याप्रमाणे होईल, असे गृहीत धरणे धोकादायक आहे. नोकरी जाणे, व्यवसायातील मंदी किंवा अचानक मोठा खर्च अशा परिस्थिती येऊ शकतात. त्यामुळे ६ ते ९ महिन्यांच्या खर्चाएवढा आपत्कालीन निधी उपलब्ध ठेवण्याचा विचार करता येतो. त्यामुळे अडचणीच्या वेळी दीर्घकालीन गुंतवणूक तोडण्याची वेळ टाळता येऊ शकते.

**५. पैशाचे अंतिम मूल्य म्हणजे स्वातंत्र्य :** पैशाचा उपयोग केवळ वस्तू खरेदी करण्यापुरता मर्यादित नसतो. पुरेशी बचत आणि गुंतवणूक असल्यास करिअरमधील बदल, काही काळ कामातून विश्रांती किंवा कुटुंबासाठी वेळ देण्यास आर्थिक आधार मिळू शकतो.

त्यामुळे आर्थिक प्रगती मोजताना 'मी किती कमावतो?' यापेक्षा 'कमाईतील किती पैसा टिकवतो आणि त्याला वाढण्यासाठी किती वेळ देतो?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. उत्पन्न वाढवणे महत्त्वाचे आहेच; पण वाढत्या उत्पन्नाबरोबर खर्च वाढत राहिला, तर संपत्ती निर्मितीचा वेग वाढत नाही. आर्थिक स्वातंत्र्याचा पाया अखेरीस मोठ्या पगारापेक्षा बचतीची सवय, गुंतवणुकीतील सातत्य आणि संयम यावर उभा राहतो.

◆◆◆

**सायबर फसवणुकीतून आलेला पैसा एका खात्यातून दुसऱ्या खात्यात फिरवण्यासाठी सामान्य नागरिकांच्या बँक खात्यांचा वापर होण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा 'मनी म्यूल' खात्यांना आळा घालण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने 'केवायसी' नियमांमध्ये महत्त्वाचे बदल प्रस्तावित केले आहेत. संशयास्पद व्यवहार आढळल्यास बँकेला संबंधित रकमेवर तात्पुरती डेबिट बंदी घालता येईल. अपवादात्मक परिस्थितीत संपूर्ण खात्यातून पैसे काढणे किंवा हस्तांतरित करणेही तात्पुरते थांबवता येईल. प्रस्तावित नियम १ एप्रिल २०२७पासून लागू करण्याचा विचार आहे.**

## संशयास्पद व्यवहारांबाबत नवी चौकट

■ अर्थ विशेष



सायबर फसवणुकीतून आलेला पैसा एका खात्यातून दुसऱ्या खात्यात फिरवण्यासाठी सामान्य नागरिकांच्या बँक खात्यांचा वापर होण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा 'मनी म्यूल' खात्यांना आळा घालण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने 'केवायसी' नियमांमध्ये महत्त्वाचे बदल प्रस्तावित केले आहेत. संशयास्पद व्यवहार आढळल्यास बँकेला संबंधित रकमेवर तात्पुरती डेबिट बंदी घालता येईल. अपवादात्मक परिस्थितीत संपूर्ण खात्यातून पैसे काढणे किंवा हस्तांतरित करणेही तात्पुरते थांबवता येईल. प्रस्तावित नियम १ एप्रिल २०२७पासून लागू करण्याचा विचार आहे.

नव्या मसुद्यानुसार बँकेच्या यंत्रणेला १,००० किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचा व्यवहार संशयास्पद आढळल्यास त्यावर तात्पुरती बंदी घालण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र व्यवहार संशयास्पद ठरवण्यासाठी बँकेला निर्धारित प्रक्रिया पाळावी लागणार आहे.

बँकेने व्यवहारावर तात्पुरती डेबिट बंदी घातल्यास त्याची माहिती खातेदाराला द्यावी लागेल. कारवाईचे कारण, बंदी हटवण्याची प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्याची संपर्क माहितीही कळवावी लागेल. मोबाइल क्रमांक किंवा ई-मेल उपलब्ध असल्यास डिजिटल माध्यमातून ही सूचना दिली जाईल.

खातेदाराला व्यवहार खरा असल्याचे स्पष्टीकरण किंवा पुरावे देण्यासाठी २० दिवस मिळतील. स्पष्टीकरण मिळाल्यानंतर बँकेला १० दिवसांत निर्णय घ्यावा लागेल. बँकेचे समाधान झाल्यास बंदी तातडीने हटवावी लागेल.

■ **कमाल ६० दिवसांची मर्यादा**

खातेदाराकडून स्पष्टीकरणच मिळाले नाही, तर तात्पुरती बंदी घातल्यापासून ३० दिवसांत बँकेला निर्णय घ्यावा लागेल. प्रकरण पोलिस किंवा अन्य कायदा अंमलबजावणी यंत्रणेकडे पाठवल्यास त्यांच्याकडून प्रतिसादासाठी ३० दिवसांची मुदत प्रस्तावित आहे. संबंधित यंत्रणेकडून बंदी सुरू ठेवण्याचे वेगळे निर्देश नसतील, तर तात्पुरत्या डेबिट बंदीचा कमाल कालावधी ६० दिवस असेल.

**सायबर आर्थिक फसवणुकीतून मिळालेली रक्कम दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने स्वीकारण्यासाठी, वेगवेगळ्या खात्यांत फिरवण्यासाठी किंवा पुढे हस्तांतरित करण्यासाठी जाणूनबुजून अथवा नकळत वापरले जाणारे खाते म्हणजे 'मनी म्यूल' खाते. अनेकदा खातेधारकाला कमिशनचे आमिष दाखवून त्याचे खाते अशा व्यवहारांसाठी वापरले जाते.**

■ **संपूर्ण खाते गोठवणे हा शेवटचा पर्याय**

महत्त्वाचे म्हणजे संशयास्पद व्यवहार आढळला म्हणून प्रत्येक वेळी संपूर्ण खाते रोखले जाणार नाही. प्रस्तावानुसार संपूर्ण खात्यावर डेबिट बंदी हा शेवटचा पर्याय असेल आणि तो अपवादात्मक परिस्थितीतच वापरावा लागेल.

त्यामुळे ग्राहकांनी अनोळखी व्यक्तींसाठी आपल्या खात्यात पैसे स्वीकारणे, कमिशनच्या बदल्यात पैसे पुढे पाठवणे किंवा स्वतःचे खाते व्यवहारासाठी दुसऱ्याला वापरू देणे टाळणे आवश्यक आहे. कारण सायबर फसवणुकीच्या पैशाचा आपल्या खात्याशी संबंध आला, तर आर्थिक व्यवहार तात्पुरते अडकण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

◆◆◆

## पीएफचे पैसे काढणार आहात?

नोकरी सोडल्यानंतर किंवा निवृत्ती जवळ आल्यानंतर भविष्य निर्वाह निधीतील पैसे काढण्याचा विचार अनेक जण करतात. मात्र पीएफ खात्यातील रक्कम आणि कर्मचारी पेन्शन योजना या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे पीएफची रक्कम काढताना पेन्शनचा हक्क, सेवेची




वर्षे आणि 'फॉर्म १०सी' याबाबत माहिती असणे आवश्यक आहे. चुकीचा पर्याय निवडल्यास भविष्यातील पेन्शनवर परिणाम होऊ शकतो.

कर्मचाऱ्याच्या मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या आधारे पीएफमध्ये योगदान जमा होते. नियोक्त्याच्या १२ टक्के योगदानातील एक भाग कर्मचारी पेन्शन योजनेकडे वळवला जातो. नियमानुसार पात्र वेतनाच्या ८.३३ टक्क्यांपर्यंतची रक्कम पेन्शन योजनेत जाते. त्यामुळे आपल्या पीएफ खात्याशी निवृत्तीनंतरच्या पेन्शनचाही संबंध असतो.

पेन्शनच्या दृष्टीने १० वर्षांची पात्र सेवा महत्त्वाची आहे. १० वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर सामान्यतः कर्मचारी पेन्शन योजनेतील रक्कम एकरकमी काढता येत नाही; सदस्याला भविष्यातील पेन्शनचा हक्क प्राप्त होतो. त्यामुळे नोकरी सोडताना पीएफबरोबर पेन्शनची रक्कम काढण्याची घाई करणे योग्य ठरत नाही.

■ **फॉर्म १०सी नेमका कशासाठी? :** फॉर्म १०सीचा संबंध मुख्यतः कर्मचारी पेन्शन योजनेशी आहे. पात्र सेवा १० वर्षांपेक्षा कमी असल्यास आणि सदस्याने नोकरी सोडली असल्यास काही अटींनुसार पेन्शन योजनेतील 'विड्रॉवल बेनिफिट'साठी या फॉर्मचा उपयोग होतो.

याच फॉर्मद्वारे 'स्कीम टिफिकेट'ही घेता येते. नोकरी बदलणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा पर्याय महत्त्वाचा ठरू शकतो. आधी केलेल्या नोकरीतील पेन्शनपात्र सेवा जतन करून पुढील नोकरीतील सेवेशी ती जोडण्यासाठी स्कीम सर्टिफिकेट उपयोगी पडते. त्यामुळे दीर्घकाळात १० वर्षांची पात्र सेवा पूर्ण करून पेन्शनचा हक्क मिळविणे शक्य होते.

■ **ऑनलाईन दावा कसा कराल?:** ईपीएफओच्या ई-सेवा पोर्टलवर यूएएन आणि पासवर्डद्वारे लॉगइन केल्यानंतर ऑनलाइन क्लेम विभागात फॉर्म १९, ३१, १०सी आणि १०डीचे पर्याय उपलब्ध असतात. पीएफची अंतिम रक्कम काढण्यासाठी फॉर्म १९, तर पात्रतेनुसार पेन्शन विड्रॉवल बेनिफिट किंवा स्कीम सर्टिफिकेटसाठी फॉर्म १०सी वापरला जातो. ऑनलाइन दावा करताना आधार, पॅन, बँक खाते आणि यूएएनशी संबंधित माहिती अद्ययावत असणे महत्त्वाचे आहे. बँक खात्याचे तपशील पडताळल्यानंतर आवश्यक पर्याय निवडून ओटीपीद्वारे दावा सादर करता येतो.

■ **१० वर्षांचा टप्पा लक्षात ठेवा:** फॉर्म १०सी भरताना सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपल्या पेन्शनपात्र सेवेचा कालावधी. विशेषतः अनेक नोकऱ्या केलेल्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक नोकरीतील पात्र सेवा विचारात घ्यावी. पीएफमधील रक्कम तातडीने हातात मिळणे आकर्षक वाटू शकते; पण पेन्शनपात्र सेवा टिकवणे दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकते.

◆◆◆

## बँकेकडून घराची मूळ कागदपत्रे हरवल्यास...




गृहकर्जाचा शेवटचा हप्ता भरल्यानंतर घर पूर्णपणे कर्जमुक्त झाल्याचा दिलासा मिळतो. मात्र बँकेकडे तारण म्हणून ठेवलेली घराची मूळ कागदपत्रे परत हातात येईपर्यंत गृहकर्जाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने पूर्ण झालेली नसते. सेल डीड, कन्व्हेअन्स डीड, अलॉटमेंट लेटर, बिल्डर-बायर करार, पझेशन लेटर, शेअर सर्टिफिकेट यांसारखी कागदपत्रे बँकेकडे असू शकतात. भविष्यात मालमत्ता विकताना, तिच्यावर पुन्हा कर्ज घेताना किंवा मालकी सिद्ध करताना ही कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची ठरतात.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँका, गृहनिर्माण वित्त कंपन्या आणि बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी कर्जाची पूर्ण परतफेड किंवा सेटलमेंट झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत मालमत्तेची मूळ कागदपत्रे ग्राहकाला परत करणे आवश्यक आहे. मालमत्तेवर नोंदवलेला कर्जाचा बोजाही दूर करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागते.

■ जाणून घ्या

या प्रक्रियेत कर्जदात्या संस्थेकडून विलंब झाला, तर ग्राहकाला प्रतिदिन ५,००० रुपये भरपाई देण्याची तरतूद आहे. त्यामुळे कर्ज फेडल्यानंतर कागदपत्रांसाठी महिनोन्महिने बँकेच्या फेऱ्या मारणे ही केवळ गैरसोय म्हणून स्वीकारण्याची गरज नाही.

बँकेकडून कागदपत्रे हरवल्यास जबाबदारी ग्राहकावर ढकलता येत नाही. अशा परिस्थितीत कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती मिळवून देण्यासाठी बँकेने मदत करणे आणि त्यासाठी येणारा खर्च उचलणे आवश्यक आहे. मूळ कागदपत्रे नसल्यामुळे मालमत्ता विक्री, नवीन कर्ज किंवा मालकीच्या पडताळणीमध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात.

सर्वप्रथम संबंधित बँक शाखा आणि तिच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार करावी. त्यात गृहकर्ज खाते क्रमांक, 'नो ड्यूज' प्रमाणपत्र आणि कागदपत्रांचा तपशील द्यावा. बँकेकडून मिळालेली प्रत्येक सूचना आणि उत्तर लेखी स्वरूपात घेणे महत्त्वाचे आहे.

तक्रारीचे समाधान न झाल्यास रिझर्व्ह बँकेच्या लोकपाल यंत्रणेकडे दाद मागता येते. कागदपत्रे खरोखर हरवली असतील तर बँकेने पोलिसांत तक्रार करणे, आवश्यक सार्वजनिक सूचना देणे आणि प्रमाणित प्रती मिळविण्याची प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. तरीही प्रश्न सुटला नाही तर ग्राहकाला उपभोक्ता आयोगाकडे जाण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

**गृहकर्ज घेतानाच ही काळजी घ्या**

मालमत्तेची कागदपत्रे बँकेकडे जमा करताना कोणती मूळ कागदपत्रे दिली आहेत याची संपूर्ण यादी बँकेच्या शिक्क्यासह लेखी स्वरूपात घ्यावी. प्रत्येक मूळ कागदपत्राची स्कॅन प्रत स्वतःकडे सुरक्षित ठेवावी. कर्ज मंजुरी पत्र, परतफेडीचे पुरावे आणि बँकेशी झालेला पत्रव्यवहारही जपून ठेवावा.

गृहकर्जाचा शेवटचा हप्ता भरल्यानंतर केवळ 'नो ड्यूज' प्रमाणपत्र घेऊन थांबू नका. बँकेकडे दिलेली प्रत्येक मूळ कागदपत्रे परत मिळाली आहेत का, याची यादी हातात घेऊन प्रत्यक्ष पडताळणी करा.

◆◆◆

## आरबीआयची रोखे विक्री गुंतवणुकीवर काय परिणाम?




भारतीय रिझर्व्ह बँकेने खुल्या बाजारातील व्यवहारांतर्गत १ लाख कोटी रुपयांच्या सरकारी रोख्यांची विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. ही विक्री ३ टप्प्यांत केली जाणार असून, त्यातील रोख्यांची मुदत आर्थिक वर्ष २०२९ ते २०३२ दरम्यान संपणार आहे. जवळपास २ वर्षांनंतर आरबीआयकडून सरकारी रोख्यांची निव्वळ विक्री होत असल्याने या निर्णयाकडे केवळ रोखे बाजारातील व्यवहार म्हणून न पाहता बँकिंग व्यवस्थेतील अतिरिक्त पैसा कमी करण्याचे महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहावे लागेल.

आरबीआय सरकारी रोखे विकते तेव्हा बँका आणि इतर पात्र संस्थांकडील पैसा या रोख्यांच्या खरेदीसाठी आरबीआयकडे जातो. परिणामी बाजारातील अतिरिक्त रोकड कमी होते.

या १ लाख कोटी रुपयांच्या रोखे विक्रीसाठी १७, २१ आणि २८ सप्टेंबर रोजी व्यवहार होणार आहेत. या घोषणेनंतर १० वर्षांच्या सरकारी रोख्यांवरील उत्पन्नाचा दर सुमारे ७ टक्क्यांपर्यंत वाढला. रोख्यांच्या किमती आणि त्यावरील उत्पन्न यांचा संबंध साधारणपणे परस्परविरोधी असतो. बाजारात रोख्यांचा पुरवठा वाढून किंमत कमी झाली, तर त्यावरील उत्पन्नाचा दर वाढू शकतो.

● **सामान्य गुंतवणूकदार थेट सहभागी होऊ शकतो का? :** या विशिष्ट खुल्या बाजारातील रोखे विक्रीत किरकोळ गुंतवणूकदारांना थेट बोली लावता येणार नाही. हे व्यवहार प्रामुख्याने बँका, प्राथमिक विक्रेते आणि पात्र संस्थांसाठी असून त्यासाठी आरबीआयच्या ई-कुबेर प्रणालीचा वापर केला जातो. मात्र याचा अर्थ सर्वसामान्य गुंतवणूकदाराला सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणूक करता येत नाही, असा नाही. आरबीआयच्या 'रिटेल डायरेक्ट' सुविधेद्वारे वैयक्तिक गुंतवणूकदार सरकारी रोखे खरेदी-विक्री करू शकतात. त्यासाठी स्वतंत्र गिल्ट खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध आहे.

● **गुंतवणूकदारांसाठी काय बदलू शकते? :** आरबीआयच्या विक्रीमुळे सरकारी रोख्यांवरील उत्पन्न आणखी वाढल्यास नव्याने रोखे खरेदी करणाऱ्यांना तुलनेने आकर्षक दर मिळू शकतात. मात्र आधीपासून बाजारात असलेल्या रोख्यांच्या किमतींवर दबाव येऊ शकतो. सरकारी रोख्यांच्या उत्पन्नातील वाढीचा परिणाम पुढे कंपन्यांच्या रोख्यांवरील दर, बँकांच्या ठेवी आणि अर्थव्यवस्थेतील इतर व्याजदरांवरही काही प्रमाणात दिसू शकतो.

सुरक्षित उत्पन्नाच्या पर्यायांचा विचार करणाऱ्या गुंतवणूकदारांनी सरकारी रोख्यांवरील उत्पन्न, मुदत आणि व्याजदरातील संभाव्य बदल यांचा विचार करूनच निर्णय घेणे योग्य ठरेल.

◆◆◆

## 'टॉप' म्युच्युअल फंडापेक्षा योग्य पैसेविभागणी महत्त्वाची

म्युच्युअल फंडात गुंतवणूक करताना बहुतेकांचा पहिला प्रश्न असतो, 'सध्या सर्वाधिक परतावा देणारा फंड कोणता?' मागील १, ३ किंवा ५ वर्षांत सर्वाधिक परतावा देणाऱ्या योजनांची यादी पाहून त्यातून फंड निवडण्याची पद्धतही लोकप्रिय आहे. मात्र तुमच्या एकूण गुंतवणुकीपैकी किती पैसा इक्विटीमध्ये, किती डेटमध्ये आणि किती सोने किंवा अन्य मालमत्तेत आहे, याचा परिणाम अधिक व्यापक असतो.

समजा, ३ वर्षांनी घरासाठी डाउन पेमेंट म्हणून मोठी रक्कम लागणार आहे. मागील ३ वर्षांत २५ टक्के परतावा दिलेला एखादा इक्विटी फंड पाहून गुंतवणुकीतील ९० टक्के पैसा त्यात टाकला. बाजार चांगला राहिला तर हा निर्णय फायदेशीर वाटेल. पण पैसे लागण्याच्या काही महिने आधी शेअर बाजारात मोठी घसरण झाली तर अडचण निर्माण होऊ शकते. याउलट त्याच उद्दिष्टासाठी काही रक्कम इक्विटीमध्ये आणि मोठा हिस्सा तुलनेने कमी जोखमीच्या पर्यायात ठेवला असेल, तर बाजारातील घसरणीचा संपूर्ण गुंतवणुकीवर होणारा परिणाम मर्यादित राहू शकतो. मूळ लेखात यासाठी ४० टक्के इक्विटी आणि ६० टक्के डेटचे उदाहरण देण्यात आले आहे. मुद्दा हे प्रमाण प्रत्येकाने वापरण्याचा नसून, गुंतवणुकीचा कालावधी आणि जोखीम यांचा मेळ घालण्याचा आहे.



आपली गुंतवणूक इक्विटी, डेट, सोने आणि अन्य मालमत्ता प्रकारांमध्ये विभागणे म्हणजे 'ॲसेट अलोकेशन' किंवा मालमत्ता वाटप. इक्विटी दीर्घकालीन संपत्तीवाढीसाठी उपयोगी ठरू शकते, तर डेटमुळे पोर्टफोलिओला तुलनेने स्थैर्य मिळू शकते. सोने काही परिस्थितीत विविधीकरणासाठी उपयोगी ठरते. हे प्रमाण ठरवताना वय, उत्पन्न, आर्थिक उद्दिष्ट, ते उद्दिष्ट किती वर्षांनी पूर्ण करायचे आहे आणि बाजारातील घसरण सहन करण्याची क्षमता या गोष्टी त्यासाठी महत्त्वाच्या असतात.

**बाजार २० टक्के पडला तर?**

गुंतवणूकदाराने स्वतःला एक साधा प्रश्न विचारावाह्बाजार २० टक्के घसरला तर मी गुंतवणूक कायम ठेवू शकेन का? तीन वर्षांनी आवश्यक असलेला जवळपास सर्व पैसा इक्विटीमध्ये असेल आणि घसरणीनंतर तोटा सहन करणे शक्य नसेल, तर समस्या फंडामध्ये नसून गुंतवणुकीच्या रचनेत असू शकते. बाजारातील घसरणीत घाबरून गुंतवणूक विकणे हा दीर्घकालीन परताव्यासाठी मोठा धोका ठरतो. योग्य मालमत्ता वाटपामुळे गुंतवणूकदाराला अशा काळात निर्णयावर टिकून राहणे तुलनेने सोपे होते.

**'टॉप फंड'च्या मागे धावण्यापूर्वी...**

मागील वर्षी सर्वाधिक परतावा देणारा फंड पुढील वर्षीही अव्वल राहील याची खात्री नसते. त्यामुळे आधी आर्थिक उद्दिष्ट निश्चित करणे, त्यासाठी उपलब्ध कालावधी पाहणे आणि त्यानुसार इक्विटी-डेटचे प्रमाण ठरवणे अधिक उपयुक्त ठरते.

◆◆◆

## दहा लाखांचा आरोग्यविमा असूनही रुग्णालयाचे बिल खिशातून का भरावे लागते?

आरोग्य विम्याचे १० लाखांचे संरक्षण घेतले म्हणजे रुग्णालयात दाखल झाल्यानंतर १० लाखांपर्यंतचे संपूर्ण बिल विमा कंपनी भरेल, असा अनेकांचा समज असतो. प्रत्यक्षात मात्र रुग्णालयातून घरी परतताना बिलातील काही हजार किंवा काही लाख रुपये स्वतःच्या खिशातून भरावे लागल्याचा अनुभव अनेक विमाधारकांना येतो. याचे कारण विमा संरक्षणाची रक्कम कमी असणे हेच नसते. पॉलिसीमधील प्रतीक्षा कालावधी, सहहिस्सा, वजावट, उपमर्यादा, रूम रेंटची मर्यादा आणि संरक्षणातून वगळलेले खर्च यामुळे प्रत्यक्ष मिळणारी रक्कम कमी होऊ शकते.

पॉलिसीवर कितीही विमा रक्कम लिहिलेली असली, तरी प्रत्येक वैद्यकीय खर्च त्यातून मंजूर होतोच असे नाही. काही पॉलिसींमध्ये विशिष्ट उपचारांसाठी स्वतंत्र उपमर्यादा असते. सहहिस्स्याची अट असल्यास मंजूर दाव्याचा ठरावीक हिस्सा विमाधारकाला भरावा लागतो. वजावट लागू असल्यास ठरावीक रकमेपर्यंतचा खर्च स्वतः करावा लागतो. रूम रेंटची मर्यादाही महत्त्वाची ठरते. पॉलिसीमध्ये पात्र खोलीच्या श्रेणीवर मर्यादा असेल आणि विमाधारकाने त्यापेक्षा महागडी खोली निवडली, तर पॉलिसीच्या अटींनुसार संबंधित खर्चावरही परिणाम होऊ शकतो.

आरोग्य विमा घेतल्यानंतर प्रत्येक आजाराला पहिल्या दिवसापासून संरक्षण मिळत नाही. आधीपासून असलेले आजार तसेच काही




विशिष्ट उपचारांसाठी प्रतीक्षा कालावधी असू शकतो. सध्याच्या नियमांनुसार हा कालावधी कमाल ३६ महिन्यांपर्यंत असू शकतो. त्यामुळे पॉलिसी घेताना केवळ हप्ता आणि विमा रक्कम पाहण्याऐवजी प्रतीक्षा कालावधी तपासणे आवश्यक आहे.

कॅशलेस सुविधा असलेल्या रुग्णालयात उपचार घेतले म्हणजे एकही रुपया भरावा लागणार नाही, असाही गैरसमज आहे. विमा कंपनी पॉलिसीच्या अटींनुसार मंजूर केलेल्या खर्चाचीच रक्कम थेट रुग्णालयाला देते. काही वैद्यकीय साहित्य, उपचार किंवा इतर खर्च संरक्षणाबाहेर असू शकतात. त्यामुळे बिलातील उर्वरित रक्कम रुग्णाला भरावी लागू शकते.

पॉलिसीचे वेळेत नूतनीकरण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मासिक हप्त्यासाठी १५ दिवस आणि तिमाही, सहामाही किंवा वार्षिक हप्त्यासाठी ३० दिवसांचा वाढीव कालावधी आहे. मात्र हप्ता न भरलेल्या कालावधीत संरक्षण उपलब्ध असेलच असे नाही.

पॉलिसी घेतल्यानंतर तिच्या अटी योग्य वाटल्या नाहीत, तर पात्र पॉलिसींमध्ये ३० दिवसांचा 'फ्री-लूक' कालावधीही उपलब्ध असतो. त्यामुळे आरोग्य विमा निवडताना 'किती लाखांचे संरक्षण?' याबरोबरच 'कोणता खर्च, किती आणि कोणत्या अटींवर मिळणार?'हा प्रश्न विचारणे अधिक महत्त्वाचे ठरते.

◆◆◆

# मनपा कर्मचाऱ्यांच्या कर्ज हप्त्यांची कपात केलेली रक्कम तातडीने द्या

**महानगरपालिकेसमोर पतसंस्थेचे संचालक मंडळ व सभासदांचे धरणे आंदोलन; मनपाकडे ४ कोटी ३१ लाख ९१ हजार ३२० रुपयांची थकबाकी**

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अडचणीच्या काळात, तसेच वैद्यकीय उपचार आणि मुला-मुलींच्या शुभकार्यासाठी तातडीने कर्जरूपी आर्थिक मदत केली जाते. या कर्जाची मासिक हप्त्याची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातून थेट कपात करून पतसंस्थेच्या खात्यावर जमा केली जाते. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून महानगरपालिका प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या कर्ज हप्त्यापोटी कपात करण्यात आलेली रक्कम पतसंस्थेला मिळालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडली असून, महापालिकेकडे आतापर्यंत तब्बल ४ कोटी ३१ लाख ९१ हजार ३२० रुपये थकबाकी असल्याचे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



मनपा कर्मचाऱ्यांच्या कर्ज हप्त्यांची कपात केलेली रक्कम तातडीने देण्याच्या मागणीसाठी पतसंस्थेच्या संचालक मंडळ व सभासदांनी महानगरपालिकेसमोर आंदोलन केले. (छाया – लहू दळवी)

महापालिका कर्मचाऱ्यांनी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांची रक्कम दरमहा त्यांच्या वेतनातून कपात केली जाते. ही कपात केलेली रक्कम पतसंस्थेच्या खात्यावर नियमितपणे जमा होणे अपेक्षित असताना गेल्या अनेक महिन्यांपासून ती वेळेवर मिळत नसल्याने संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. याबाबत पतसंस्थेने महापालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून तसेच सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे संचालक मंडळाचे म्हणणे आहे.

पतसंस्थेला जिल्हा बँकेकडून सुमारे ३ कोटी रुपयांचे कॅश क्रेडिट कर्ज उपलब्ध होत असते. मात्र, सदर कॅश क्रेडिटची मर्यादाही संपल्याने पतसंस्थेसमोर आर्थिक अडचणी अधिक गंभीर झाल्या आहेत. सभासदांच्या कर्जाच्या हप्त्यांची कपात महापालिकेच्या माध्यमातून होत असतानाही ही रक्कम संस्थेला मिळत नसल्यामुळे कर्जवाटप व दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर परिणाम होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

कपात केलेल्या कर्ज हप्त्यांची रक्कम तातडीने पतसंस्थेच्या खात्यावर जमा करावी, या मागणीसाठी पतसंस्थेच्या संचालक मंडळासह सभासदांनी महापालिका प्रशासकीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. वारंवार पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी महापालिकेकडून थकीत रक्कम तातडीने मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. महापालिका कर्मचाऱ्यांच्या पगारातून कर्जाच्या हप्त्याची रक्कम नियमितपणे कपात केली जाते; मात्र ती रक्कम पतसंस्थेला मिळत नसल्याने संस्था मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहे. जिल्हा बँकेकडील कॅश क्रेडिटची सुविधाही संपली असल्याने आता पतसंस्थेला दुसरा पर्याय उपलब्ध नसून पतसंस्थेला लॉक लावण्याची वेळ आली आहे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना अडचणीच्या काळात कर्जाच्या स्वरूपात आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे महापालिकेकडे थकीत असलेली कर्जवसुलीची रक्कम तातडीने पतसंस्थेला उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी संचालक मंडळ व सभासदांनी केली आहे. थकीत रक्कम वेळेत न मिळाल्यास पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर त्याचा परिणाम होऊन सभासदांनाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

मनपाकडे थकीत रक्कम : ४ कोटी ३१ लाख ९१ हजार ३२० रुपये

जिल्हा बँकेचे कॅश क्रेडिट : ३ कोटी रुपये

कर्ज हप्त्यांची रक्कम : गेल्या चार महिन्यांपासून पतसंस्थेला मिळाली नसल्याचा दावा

मागणी : कपात केलेली रक्कम तातडीने पतसंस्थेच्या खात्यावर जमा करावी

या धरणे आंदोलनावेळी चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हॉइस चेअरमन कैलास चावरे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, अजय कांबळे, विजय कोतकर, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, विकास गीते, बलराज गायकवाड, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, बाळासाहेब पवार, प्रमिलाताई पवार, शेखर देशपांडे, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी, तसेच संतोष गवळी, राजू तडवी, बाला तिवारी, बालाजी गंगेकर, सोनू चौधरी आदी सभासद उपस्थित होते.



## गुरुवाणी – ६३
## हृदयातून महावीर स्तुती

भगवान महावीरांआधी भगवान पार्श्वनाथ यांचा धर्म संघ होता. त्या धर्म संघात अनेक केवलज्ञानी होते. हे असूनही तीर्थंकर महावीरांची नवीन व्यवस्था प्रवर्तन केले. विराट धर्म संघ असताना तीर्थंकर महावीरांनी नवीन धर्म संघ का निर्माण केला? सुधर्मा स्वामी सांगतात, संघ कोणता श्रेष्ठ आहे हे त्या संघाचा नेता कोण आहे, यावर अवलंबून असते. संविधान, व्यवस्था तीच असते, पण ते चालवणारा नेता कसा आहे हे महत्त्वाचे असते. जसा नेता तसे संघटन. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल स्वामी समर्थ रामदास म्हणतात, 'निश्चयाचा महामेरू सकल जनांसी आधारू'. नेता जलद निर्णय घेणारा हवा. अर्जुन माली समोर सुदर्शन आहे. पण सुदर्शनकडे भगवान महावीरांचे रक्षा कवच असते. समीक्षा करताना कल्याणाची प्रज्ञा करायची असते आणि निर्णयही जलद व्हायला पाहिजे, तरच उपयोग होतो. अशी रक्षा प्रणाली निर्माण करायची की कोणी ती भेदू शकत नाही. नेता असा हवा की तो तुमच्यासाठी मजबूत ढाल बनला पाहिजे. बिना नेत्याचा समूह चालू शकत नाही. तीर्थंकर महावीरांना सगळ्यांनीच आपला नेता म्हणून स्विकार केला तर सुधर्मा स्वामींच्या गाथेची अनुभूती तुम्हाला येईल. आजच्या काळात नेता नाही ही अडचण नाही तर नेत्याला आपण नेता मानत नाही ही अडचण आहे. दुर्दैवाने आज आपल्याला नेता असा हवा असतो की जो तुमच्या समोर झुकेल. आज समाज कमजोर नाहीय, पण समाजाच्या सामर्थ्याला दिशा देणारा नेता पाहिजे. नेत्यावर पूर्ण श्रद्धा हवी. तीर्थंकर महावीरांचे नेतृत्व इतके सक्षम होते की भगवान पार्श्वनाथ यांच्या विराट धर्म संघानेही कालांतराने त्यांचे नेतृत्व मान्य केले. सुधर्मा स्वामी सांगतात, 'देव सगळे समर्थ आहेत, पण त्या देवांचे नेतृत्वही इंद्रदेव करतो'. नेतृत्व सामर्थ्यवानांचे करायचे असते, लाचारांचे नाही. लाचारांची निष्ठा कधीही बदलू शकते. महानुभाव असे असतात की ज्यांच्या केवळ स्मरणाने काम होते, त्यांना स्वतः यावे लागत नाही. नेता लोकांना अशा ठिकाणी घेऊन जातो, जिथे लोकांना जायचे नसते.पण तिथं गेल्यावर लोकांना जाणीव होते, आपण योग्य ठिकाणी आलो आहोत. नेता विचारांनी तुमच्या शंभर पावले पुढे असतो. एकाच वेळी हजारो विविध प्रकारच्या लोकांना एकत्र आणून नेतृत्व करायचे असते. तीर्थंकर महावीर एकाच वेळी असंख्यांचे नेतृत्व करायचे. हे सुधर्मा स्वामींचे अनोखे महावीर आहेत. संकल्प करा 'माझ्या परीवारातील प्रत्येकाच्या मुखात, हृदयात महावीर स्तुतीगान असेल'.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



## गुरुवाणी – ६४
## तीर्थंकरांचा ज्योतिर्मय सागर

नऊ तत्वातील सर्वात महत्वाचे तत्व बंध तत्व आहे. मनात चांगले भाव आलेत पण टिकत नाहीत. म्हणजे बंध होत नाही. रोहिणेय चोराला तीर्थंकर महावीरांच्या केवळ एकाच वाक्याचा आश्रव झाला. त्यातून त्याला बंध पडला. त्याला आस्रवेने बंध नव्हता झाला. तरीही त्याला फळ मिळालेच. तीर्थंकरांचे वचन तुम्ही कोणत्याही भावनेने ऐका त्याच्यावर तुमच्या भावनेचा परिणाम होत नाही. तीर्थंकरांचे एक वचन सुद्धा लोकांना तीर्थ बनवते. विजेता बनवते. रोहिणेय चोराच्या मनात त्याची इच्छा नसताना तीर्थंकर विचारांचे बीजारोपण झाले. ते चांगल्या पद्धतीने उगवलेच. तीर्थंकरांचे कोणतेही वचन तुम्हाला तीर्थ बनवतेच. जे चांगले ऐकले त्याची मनात उजळणी करत रहा खूप चांगला बंध होईल. चैत्रेईत आठव्या अध्यायाची आराधना सुरू होती. मी आराधना झाल्यावर वेगळ्या मार्गाने एकटाच परतायचो. पण एक श्रद्धाळू अचानक समोर आला व त्याने माझे पाय धरले. त्याने सांगितले मी, सर्व वाईट सवयींचा त्याग करणार. त्याच्या मनाला अध्यायातील एक वचन प्रचंड भावले होते. ही असते तीर्थंकर बंधची ताकद. जर तुमच्या तनमनात तीर्थंकरांचा खोल बंध झाला तर इतर चुकीच्या गोष्टी तुमच्यात येणारच नाही. अक्षय प्रज्ञेत कधी क्षीणता येत नाही. ज्याच्यातून कधी क्षय होत नाही. आचार्य भगवंतांची प्रज्ञा अक्षय प्रज्ञा होती. त्यांना सगळ्या जुन्या गोष्टी अचूक आठवत. आजचे मेडिकल सायन्स सुद्धा सांगते, विस्मरण आजार होऊ द्यायचा नसेल तर रोज नवनवीन ज्ञान प्राप्त करत रहा. गुरुदेव कुठेही असले तरी दररोज काही ना काही नवीन ज्ञान मिळवायचे. तुम्ही हा नियम तुमच्या जीवनात अंगिकारला पाहिजे. ज्ञान हे मेंदूचा खुराक आहे. रोज नवीन शिका, नवीन वाचा. ९२ व्या वर्षीही गुरुदेवांची बुद्धी खूप फ्रेश होती. लोखंडाचा उपयोग नाही केला तर त्याला गंज लागतो. मेंदूलाही सतत कार्यमग्न ठेवले तरच तो तेज होतो. तीर्थंकरांच्या अनंत प्रज्ञेचा महासागर आहे. आपले सौभाग्य आहे, आपल्याला या महासागरात डुबकी मारण्याची संधी मिळते. अशा अमृत सागरात डुबकी लावल्यावर लाभ होणारच. परमात्म्याच्या सागरात कधी वादळ येत नाही. आपल्या तर चहाच्या पेल्यातही वादळ येते. सुधर्मा स्वामी परमात्म्यासाठी भिक्षू हा शब्दप्रयोग करतात. भगवान कशाचे भिक्षू आहेत. त्यांना तर केवलज्ञान प्राप्त आहे. ते असे भिक्षू होते की देणाराही भगवान व्हायचा. भिक्षा देणारे धन्य व्हायचे. परमात्म्याचा सागर ज्योतिर्मय आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## लालटाकी येथे किरकोळ वादातून तरुणाला बेदम मारहाण; गुन्हा दाखल

नगर –शहरातील लालटाकी परिसरातील भास्कर कॉलनीत परिसरात २७ सप्टेंबर रोजी रात्री एका किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत जय रावसाहेब डाके (वय २२, रा.भास्कर कॉलनी, लालटाकी, अहिल्यानगर) हा जखमी झाला आहे.

जखमी जय डाके याने आरोपी आदेश शेखर शिंदे (रा. सिद्धार्थनगर) याला 'बिर्याणी खायला यायचे आहे का?' असे विचारले. या साध्या प्रश्नाचा आरोपीला राग आला आणि त्याने मी काय भिकारी आहे का? असे म्हणून फिर्यादीच्या डोक्यात हातातील लोखंडी कड्याने जबर मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले आहेत. या वादादरम्यान फिर्यादीच्या कुटुंबीयांनाही दम दाटी करत वाईट शिवीगाळ करण्यात आली आणि त्यांना धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली गेली. या घटनेमुळे परिसरात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुख्य आरोपीसह मंजू भोसले, लताबाई भोसले यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून दुकानदाराला मारहाण; मोबाईलही हिसकावला

नगर – सावकारी अर्जाच्या सुनावणी संदर्भातील पत्र घेण्यासाठी गेलेल्या एका इलेक्ट्रीक दुकानदाराला जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी धक्काबुकी करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. यावेळी त्यांचा मोबाईलही हिसकावून घेण्यात आला.

याबाबत सय्यद अल्ताफ गुलाब (वय ४३, रा. गांधीनगर, बोल्हेगाव) यांनी २७ सप्टेंबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे बोल्हेगाव येथे 'मुस्कान इलेक्ट्रीक्स' नावाचे दुकान आहे. त्यांनी सावकारीसंदर्भात जिल्हा उपनिबंधक कार्यालयात अर्ज केले होते. २१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी कार्यालयातील कर्मचारी मिथुन कावट यांच्या फोनवरून फिर्यादी पत्र आणण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी पोहोचताच कर्मचारी देवीदास पारधे यांनी त्यांना मागून धक्का दिला.

यावेळी कर्मचारी देवीदास पारधे, सुरेश बनसोडे, ड्रायव्हर आकाश टाक आणि अश्विनी खरपुडे यांनी संगनमत करून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, डीडीआर कार्यालयाचा ड्रायव्हर आकाश टाक याने फिर्यादीच्या डाव्या डोळ्यावर फायटरसारख्या वस्तूने मारून गंभीर जखमी केले आणि त्यांच्याजवळील सुमारे १५ हजार रुपये किमतीचा पांढऱ्या रंगाचा विवो वाय ४०० मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. या मोबाईलमधील पुरावे नष्ट करण्यासाठीच हा प्रकार घडल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या मारहाणीनंतर जखमी व्यावसायिकाने सुरुवातीला अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात आणि नंतर विखे पाटील रुग्णालयात दोन दिवस उपचार घेतले. त्यानंतर याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी नुसार पोलिसांनी आकाश टाक व इतरांच्या विरुद्ध बी.एन.एस. कलम ११८ (१), ११५(२), ३०४ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## गांजा कारवाईतील तक्रारीनंतर ४ पोलिसांच्या बदल्या

नगर – कोतवाली पोलिसांनी केलेल्या कथित गांजा कारवाईतील कागदपत्रे, स्टेशन डायरीतील नोंदी आणि सीसीटीव्ही फुटेजमधील घटनाक्रमात विसंगती असल्याची तक्रार करण्यात आल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीदरम्यान चौकशी प्रक्रियेवर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी कोतवाली पोलीस ठाण्यातील चार पोलीस अंमलदारांच्या अन्य पोलीस ठाण्यांत तात्पुरत्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तसेच पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी तातडीने कार्यमुक्त करण्यात आले आहे.

पोलीस अंमलदार रोहिणी दरंदले आणि पल्लवी रोहकले यांची भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात, दीपक रोहकले यांची बेलवंडी पोलीस ठाण्यात, तर अतुल काजळे यांची सुपा पोलीस ठाण्यात तात्पुरती बदली करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांनी पुढील आदेशापर्यंत संबंधित पोलीस ठाण्यात कामकाज पाहावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांची यापूर्वीच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली होती. मात्र, त्यांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आले नसल्याने आता त्यांना बदलीच्या ठिकाणी तातडीने कार्यमुक्त करण्यात आले आहे.

यासंदर्भातील आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी काढले आहेत. दरम्यान, कोतवाली पोलिसांनी १० जुलै २०२६ रोजी केलेल्या कथित एनडीपीएस कारवाईबाबत शाकीर शेख यांनी तक्रार केली होती. चौकशी सुरू असताना संबंधित पोलीस अंमलदार त्याच पोलीस ठाण्यात कार्यरत राहिल्यास चौकशी प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांच्या तात्पुरत्या बदल्या करण्यात आल्याचे या आदेशात म्हटले आहे.

# भिंगार कॅन्टोन्मेंटला दोन एफएसआयची मंजुरी

**संरक्षण खात्याकडून राजपत्रात अधिसूचना जारी; विकासाला मिळणार चालना; बहुमजली इमारती उभारण्याचा मार्ग मोकळा : वसंत राठोड**

नगर – भिंगारवासीयांच्या वर्षानुवर्षांच्या मागणीला अखेर यश आले असून, भिंगार कॅंटोन्मेंट बोर्ड कार्यक्षेत्रात आता २ एफएसआयला (चटईक्षेत्र) मंजुरी देण्यात आली आहे. संरक्षण खात्याने यासंदर्भात सुधारित राजपत्रात अधिसूचना जारी केली आहे. यासाठी तत्कालीन खासदार डॉ.सुजय विखे यांनी लोकसभेत याबाबत विषय मांडला होता. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी कॅंटोन्मेंट बोर्डाचे तत्कालीन मुख्याधिकारी मोरे आणि नामनिर्देशित सदस्य या नात्याने मी बिल्डिंग बायलॉजमध्ये बदल करण्याचा ठराव करून एफएसआय वाढविण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली होती. त्यास आता यश आले आहे, अशी माहिती भिंगार कॅंटोन्मेंट बोर्डाचे नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांनी दिली.



माजी खा. डॉ. सुजय विखे



वसंत राठोड

वसंत राठोड पुढे म्हणाले, आतापर्यंत भिंगार कॅंटोन्मेंट क्षेत्रात केवळ १ एफएसआय लागू असल्याने उपलब्ध जागेवर बांधकाम करण्यावर मोठ्या मर्यादा होत्या. परिणामी वाढत्या कुटुंबांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बांधकामाच्या मर्यादेमुळे वाढीव बांधकाम करता येत नसे. आशा विविध अडचणींमुळे अनेक कुटुंबांना भिंगारबाहेर स्थलांतर करावे लागले. मात्र आता भिंगारमधील बांधकामाच्या मर्यादा वाढल्याने वर्षानुवर्षे रखडलेल्या भिंगारच्या विकासाला आता चालना मिळणार असून, हजारो मालमत्ताधारकांना मोठा दिलासा मिळणार असल्याने भिंगार वासियांसाठी ही मोठी आनंदाची घोषणा आहे, आता एफएसआय दुप्पट झाल्याने स्वतःच्याच जागेत गरजेनुसार अधिक बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याचा फायदा हजारो मालमत्ता धारकांना होणार असून भिंगार मध्येही बहुमजली इमारती उभारण्याचा मार्ग मोकळा झाल्याने भिंगारच्या विकासाला आता चालना मिळणार आहे.

भिंगार परिसरात वाढीव एफएसआयच्या मागणीसाठी नागरिक तसेच विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदने देण्याबरोबरच अनेकदा आंदोलनेही केली. दोन वर्षांपूर्वी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे तत्कालीन मुख्याधिकारी मोरे आणि वसंत राठोड यांनी बिल्डिंग बायलॉजमध्ये बदल करण्याचा ठराव करून एफएसआय वाढविण्याची मागणी केंद्र सरकारकडे करून केलेल्या पाठपुराव्याला आता यश मिळाले असून संरक्षण विभागाने २ एफएसआयला मंजुरी दिली आहे.

या मंजुरीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंग, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ.संग्राम जगताप, डॉ.सुजय विखे यांच्यासह कॅन्टो. बोर्डाचे अध्यक्ष ब्रिगेडीअर पी.सुनीलकुमार, मुख्याधिकारी प्रिया पुरोहित, अभियंता अशोक फुलसुंदर व प्रवीण बागल यांचेही वसंत राठोड यांनी आभार मानले.

# पांढरीपुल येथे तरूणाचा खून करणारे तिघे गजाआड

**न्यायालयाने सुनावली ३० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी**

नगर – पांढरीपुल येथील हॉटेल गुडलकमध्ये सागर महादेव ऊरूडे (वय २८, रा. दातरंगे मळा, नालेगाव) या तरूणाचा मारहाणीत मृत्यू झाल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी सुरूवातीला दोघांना अटक केल्यानंतर तपासात आणखी एका संशयित आरोपीचा सहभाग निष्पन्न केला आहे. या प्रकरणात सागर भारत आव्हाड (वय २२, रा. पांगरमल), शेखर राजेंद्र खंडागळे (वय २३, रा. पांढरीपुल, गुंजाळे, ता. नेवासा) आणि विठ्ठल गंगाराम काळे (रा.खोसपुरी, ता. अहिल्यानगर) अशा तिघांना अटक करण्यात आली आहे.



याप्रकरणी मयत सागर याचा भाऊ विशाल महादेव ऊरूडे यांनी २५ सप्टेंबर रोजी रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, ऋषिकेश आव्हाड हा पांढरीपुल येथे हॉटेल सुरू करणार होता. हॉटेल सुरू करण्याच्या पूर्वतयारीसाठी तसेच पुढे व्यवस्थापक म्हणून काम करण्यासाठी सागर ऊरूडे याला सोबत कामाला नेण्यात आले होते. याचदरम्यान सागर आव्हाड व शेखर खंडागळे यांनी सागर ऊरूडे याला गंभीर मारहाण केली. या मारहाणीत सागरचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

गुन्हा दाखल होताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या आदेशाने उपनिरीक्षक अमोल गर्जे, अंमलदार बापुसाहेब फोलाणे, शैलेश रोहोकले, देविदास खेडकर, राजू सुद्रीक यांचे पथक आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आले. त्यांनी सुरुवातीला सागर आव्हाड आणि शेखर खंडागळे या दोघांना ताब्यात घेत अटक केली. दरम्यान, या दोन्ही आरोपींना न्यायालयाने ३० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना विठ्ठल काळे याचा या प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

## गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान ३ मोटारसायकलची चोरी

नगर – नगर शहरातील भिंगारवाला चौक, घुमरे गल्ली आणि माळीवाडा भागात गणपती विसर्जन मिरवणूक सुरू असताना अज्ञात चोरट्यांनी विविध ठिकाणांहून तीन मोटारसायकल चोरून नेल्याच्या घटना २५ सप्टेंबर रोजी रात्री घडल्या आहेत. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संदीप मारुतराव गारुडकर (वय ४४, रा. सावतानगर, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २५ सप्टेंबर रोजी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास त्यांची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच १६ बीजी ५५५२) ने कापडबाजार, भिंगारवाला चौक येथे गणपती विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी आले होते. त्यांनी आपली गाडी हँडल लॉक करून जैन मंदिरासमोर पार्क केली आणि मिरवणूक पाहण्यासाठी दाळ मंडईत गेले. त्यानंतर रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास ते परत आले असता त्यांची मोटारसायकल त्या ठिकाणी दिसून आली नाही.

परिसरात शोध घेत असताना त्यांचे ओळखीचे सचिन सुरेश तेजी (वय ३४, रा. महात्मा कॉलनी, भिंगार) व रावसाहेब गवाजी सोनवणे (रा. आलमगीर, भिंगार) हे देखील त्यांना भेटले. त्यांनीही त्यांची हिरोहोंडा स्प्लेंडर (क्र. एमएच १६ एच २८३२)आणि सीडी डिलक्स (क्र. एमएच १६ झेड ६९४५) या मोटारसायकल बेडेकर क्लासजवळ घुमरे गल्ली व माळीवाडा वेससमोर पार्क केल्या होत्या.त्या गणपती मिरवणूक बघत असताना अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे सांगितले. अशा प्रकारे तिघांच्या ३ मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी लांबवल्याचे निष्पन्न झाल्यानंतर फिर्यादीने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीनुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## कांदा व्यापाऱ्यास लुटणाऱ्या फरार आरोपीला पकडले

नगर – नगर शहरातील कांदा व्यापाऱ्यावर कोयत्याने वार करून लुटण्याचा आणि गेल्या २ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. अंकुश उर्फ अर्जुन नामदेव पवार (वय २९, रा. प्रगती शाळेसमोर, राहुरी, ता. राहुरी) असे या आरोपीचे नाव आहे.



जिल्ह्यातील पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेस दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, रमीजराजा आत्तार, आजिनाथ पाखरे, सागर ससाणे, रोहित येमुल, प्रशांत राठोड व जालींदर साखरे यांचे विशेष पथक तयार करून त्यांना योग्य त्या सूचना व मार्गदर्शन देऊन तपासासाठी रवाना केले होते.

२७ सप्टेंबर रोजी हे पथक राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत फरार आरोपींचा शोध घेत असताना, पथकाला मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे कोतवाली पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी देवळाली प्रवरा ते बेलापूर जाणाऱ्या रोडवर उभा असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने तात्काळ संबंधित ठिकाणी सापळा रचून अंकुश उर्फ अर्जुन नामदेव पवार यास ताब्यात घेतले.

या आरोपीच्या गुन्हे अभिलेखाची पडताळणी केली असता, तो कोतवाली तसेच राहुरी पोलीस स्टेशनच्या गुन्ह्यात पाहिजे असल्याचे निष्पन्न झाले.

## चेन स्नॅचिंग करणारी टोळी जेरबंद; नगरसह संगमनेर शहर व तालुक्यातील तीन गुन्हे उघडकीस

नगर – सण, यात्रा आणि धार्मिक कार्यक्रमांदरम्यान गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र तसेच नागरिकांच्या सोन्याच्या चेन चोरणाऱ्या पाथर्डी तालुक्यातील टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. त्यांच्या कडे केलेल्या चौकशीत नगर शहरातील नालेगाव, संगमनेर तालुक्यातील पारगाव आणि संगमनेर शहरातील असे तीन चेन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



नागपंचमी सणानिमित्त १७ ऑगस्ट रोजी नालेगाव परिसरात देवदर्शनासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरट्याने लंपास केले होते. याप्रकरणी सौ.पुनम गणेश गडाख (वय ३५, रा.नालेगाव, अहिल्यानगर) यांच्या फिर्यादी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर जिल्ह्यातील मालमत्तेविरूध्दचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना दिले होते. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार अतुल लोटके, विजय ठोंबरे, रणजीत जाधव, अमृत आढाव व प्रशांत राठोड यांचे पथक तयार करण्यात आले.

तपास पथक २६ सप्टेंबर रोजी पाथर्डी शहरात गर्दीचा फायदा घेऊन सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या आरोपींची माहिती घेत असताना त्यांना माहिती मिळाली. नागपंचमीच्या दिवशी नालेगाव येथे गर्दीचा फायदा घेत मंगळसूत्र चोरी करणारा पांडुरंग सोन्याबापू मासाळकर हा साथीदारांसह तीसगाव येथील शिवशक्ती केटरिंगसमोर बसल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी पंचासमक्ष कारवाई करून पांडुरंग मासाळकर (वय ४६, रा.विजयनगर, ता.पाथर्डी) याच्यासह राजेंद्र दामू माने (वय ३७, रा.नाथनगर, पाथर्डी), नारायण दशरथ गायकवाड (वय ४०, रा.एकनाथवाडी, ता.पाथर्डी) आणि हिरालाल सुखदेव जाधव (वय ४२,रा.मिडसांगवी, ता.पाथर्डी) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चोरीच्या दागिन्यांबाबत पोलिसांनी चौकशी केली असता संशयित पांडुरंग मासाळकर याने चोरी केलेले सोन्याचे दागिने पाथर्डी येथील एका पडक्या खोलीत लपवून ठेवल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलीस पथकाने पंचासमक्ष तेथून सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याची चेन असा ५ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींना तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

